म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
3843



# प्रिय मुली...



REFBK-0026661

## दादा धर्माधिकारी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

त्रना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे,
। न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे
दा वर्गणी भरावी लागले.

3 FEB 1993

1 JUN 1997

( क्रु. मा. पहा )
१००००–११–८९

संदर्भ
निबंध
3४८3
२६६४९
१०।८।८२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क. 3४८3 निबंध
२६६४९
१०।८।८२
कोपरी शाखा (ठाणे पूर्व)

REFBK-0026661

**प्रिय मुली ---**

**दादा धर्माधिकारी**

चेतश्री प्रकाशन, मुक्ताई, अमळनेर

मूल्य रू. ३५/-

प्रकाशक : सौ. यशोदा वा. सोनार
चेतश्री प्रकाशन, अमळनेर

सौ. तारा धर्माधिकारी

प्रथमावृत्ती - १ डिसें. १९९१

मुखपृष्ठ - वा. रा. सोनार

अक्षर जुळणी - का. सं. वाणी मराठी
प्रगत अध्ययन संस्था,
धुळे.
मुद्रण - प्रिन्ट - ओ - ग्राफिक,
नाशिक.

---

या पुस्तकाच्या प्रकाशनास सौ. निर्मलाबेन
बालकिसन श्रॉफ, बऱ्हाणपूर यांचे सहाय्य
लाभले आहे. आभार!

---



**उषाताई तामस्कर**
**जन्म - २१ जानेवारी १९२१**
**मृत्यु - ३१ ऑक्टोंबर १९९०**

## अर्पणपत्रिका

कै. दादांनी जिचे वर्णन खालील शब्दात केले—

माझे पहिले अपत्य माझी ज्येष्ठ कन्या जिच्या जन्माच्या वेळी माझ्या जीवनात पहिले क्रांतीकारक स्थित्यंतर झाले. मी कॉलेज सोडून बापूंच्या असहकारितेच्या चळवळीत सामील झालो. तिचे नाव उषा—बबी. तिच्या जन्माबरोबरच माझ्या जीवनाच्या एका उदात्त प्रकरणाचा आरंभ झाला. माझी उषा, हेमवती, मांगल्य प्रवर्तक आणि भाग्याची ठरली.

बबी म्हणजे प्रयागची गंगा. स्वच्छ पवित्र आणि पारदर्शक. पण खळखळ वाहणारी. कधी या काठाशी तर कधी त्या काठाशी खेळणारी !

त्या—

दादांच्या ज्येष्ठ कन्या कै. सौ. उषाताई तामस्कर यांना अर्पण.

# भूमिका

कै. आचार्य दादा धर्माधिकारी गांधी विचारांचे ज्येष्ठ व श्रेष्ठ भाष्यकार मानले जातात. त्यांचा मृत्यूला सहा वर्षे लोटली आहेत. तरी त्यांचे विचार आजमितीसहि जिवंत वाटतात कारण भारतीय लोकशाहीचा विधाता तरुण नागरिक म्हणजे तरुण स्त्री पुरुष बनले पाहिजेत, हा त्यांचा ध्यास होता. त्यांच्या स्नेहमय व वात्सल्यपूर्ण स्वभावामुळे अनेक तरुण मुले व मुली दादांच्या परिवाराशी मुलांमुलींच्या भूमिकेतून समरस झाली होती. दादांचे कुटुंब रक्तसबंधापुरतेच मर्यादित नसल्याने त्यांच्या जीवनाला मैदानी मोकळेपणा लाभला. व परिमित गृहजीवनाच्या व संकुलित कुलाभिनाच्या कल्पनेऐवजी क्षितीजव्यापी भव्यता लाभली. दादांनी सार्वजनिक कामांच्या अनुषंगाने. सर्व हिंदुस्थानभर प्रवास केला. त्यांच्या कुटुंबात अक्षरशः सर्व धर्मांची, सर्व प्रांताची व सर्व जातीची मुले मुली सामील झाली, कौटुंबिक भावनेचा विस्तार हे जणू त्यांनी जीवित कार्यच मानले. त्यामुळे त्यांचे जीवन अखिल भारतीय होते.

लोकशाहीत मन विकले जाऊ नये, विकत घेतले जाऊ नये आणि बळजोरीने हिसकावले जाऊ नये यासाठी त्यांनी जन्मभर समाजप्रबोधनाचे कार्य केले. तरुणपिढीच क्रांती घडवून आणू शकेल असा त्यांचा विश्वास होता. म्हणून ते तरुणांना सांगत, संकटांना सामोरे जा, समस्यांशी सामना करा. कुठल्याहि संघटनेचा विचार करु नका. फक्त तुमच्या अंतःकरणात उठलेल्या विचारांची प्रेरणा स्वीकारा. गुरु, ग्रंथ आणि संस्था यांची गुलामगिरी कदापि पत्करु नका. तुमच्यात स्फूर्ती आहे, शक्ती आहे, उत्साह आहे, हिंमत नसेल तर, बाळगा. पुढे जा. आजच्या समाजात क्रांति घडवून आणावयाची असेल तर संप्रदाय, जाती, भाषावाद, वर्गभेद यांचे निराकरण करा . अशा तऱ्हेने क्रांतिप्रवण तरुणपिढीचा ध्यास दादांना लागला होता आणि त्याच भूमिकेतून त्यांनी स्त्रीविषयक समस्यांचे सतत पन्नास वर्षे चिंतन करुन स्त्री पुरुष सहजीवनाविषयी मौलिक विचार मांडले.

भारतीय घटनेने पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही मूलभूत अधिकार प्रदान

केले. वारसाहक्कही दिले. संपूर्ण नागरिकत्वाचे हक्क प्रदान झाल्यावर देखील स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने सहनागरिकत्वाच्या भूमिकेतून निर्भीडपणे जीवन कंठता येईल की नाही हा स्त्रियांसमोर व भारतीय लोकशाही समाज व्यवस्थे पुढील यक्षप्रश्न आहे. नुकतेच Sexual violence नावाचे पुस्तक लंडन रेप क्रायसिस सेन्टरने प्रसिध्द केले आहे. त्यात अत्यंत उपरोधिकपणे स्त्रियांनी बलात्कार टाळण्यासाठी कुठले नियम पाळावेत याबाबत विवेचन केले आहे. रात्री एकटयाने बाहेर पडू नये कारण त्यामुळे पुरुषास बलात्कार करण्याचे उत्तेजन मिळते. किंबहुना दिवसाच्या कुठल्याही समयी एकटयाने बाहेर पडू नये कारण केव्हाही पुरुष असे कार्य करण्यास उत्तेजित होऊ शकतात. घरीसुध्दा राहू नये. कारण बाहेरुन येणारी काही आगंतुक माणसे व नातलग सुध्दा बलात्कार करण्यास प्रवृत्त होण्याची भीती आहे. कपडे न घालता बाहेर पडू नये त्यामुळे काहीजण बलात्कार करण्यास उधुक्त होण्याचा संभव आहे. कपडे घालूनही बाहेर पडू नये कारण कपडे सुध्दा काही माणसांना बलात्कार करण्यास उद्दीपित करतात. बालपण टाळा. कारण काही बलात्कारी पुरुषांचा लहान मुलींवर डोळा असतो म्हातरपण टाळा. कारण काही पुरुष म्हाताऱ्या स्त्रियांनाच बलात्कार करण्यासाठी पसंत करतात. वडील आजोबा, काका अगर भाऊ यापैकी कुणीही नातलग नकोत कारण हे सुध्दा अनेकदा तरुण स्त्रियांवर होणाऱ्या बलात्कारास प्रेरित होऊ शकतात लग्न संबंधात बलात्कार कायदेशीर मानला जातो. थोडक्यात म्हणजे बलात्कार टाळावयाचे असतील तर जगूच नका ! अस्तित्वच टाळा !

हे सारे नियम आणि भूमिका अर्थात अतिरेकी व विनोदी वाटते परंतु यात विनोदापेक्षा वेदनेचाच भाग अधिक आहे व सद्यपरिस्थितीचेच दर्शन आहे हे विसरता येणार नाही.

लोकसभेत गृहमंत्रींनी हुंडाबळीचे जे आकडे जाहीर केले आहेत तेही परिस्थितीची भयानकता दाखवितात केवळ १९९० सालात ८७८ खून फक्त हुंड्यासाठी करण्यात आले, तर १४७९ केसेसमध्ये स्त्रिांनी हुंडामागणीच्या प्रश्नावरुन आत्महत्या केल्या. हे आकडे प्रत्यक्ष नोंदणी झालेल्या गुन्ह्यांचे आहेत. याशिवाय नोंदणी न झालेल्या हुंडाबळींचीसंख्या अधिक असण्याचा संभव आहे. स्त्रियांच्या बाबतीत १९९० साली जे इतर गुन्हे घडले त्यात ९५१७ केसेस बलात्काराच्या, २०,१८६ केसेस विनयभंगाच्या आणि ११,६८९ केसेस स्त्रियांना पळवून नेल्याच्या आहेत. केवळ या आकडेवारीवरुनच परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येऊ शकेल.

लोकसभेत गृहराज्यमंत्री श्री. एम.एम.जेकब यांनी दिलेल्या माहितीनुसार हुंडाबळी घेण्यात देशभरात महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक असून महाराष्ट्रात ८५८ हुंडाबळीची संख्या गेल्या वर्षी नोंदण्यात आली.

गेल्या वर्षी सार्कने बालिका वर्ष साजरे करण्याचे आवाहन करुन मुलींच्या प्रश्नाविषयी विविध पैलूंचे दर्शन घडविणारे साहित्य निर्माण करण्यास प्रोत्साहन दिले त्याचवेळी दादांनी मुलींना लिहिलेल्या या पत्रांची मला तीव्रतेने आठवण झाली. दादांची ही पत्रे उत्कृष्ट साहित्यांचा नमुना आहे कारण त्यांना सारी माणसे, त्यांच्या गुणदोषासकट आवडत असत व त्यांच्या सुखदु:खाशी व समस्यांशी ते जिव्हाळ्याने समरस होत. पत्रलेखकाच्या नात्याने त्यांचे हृदय, ज्याला ते पत्र लिहित, त्या व्यक्तीच्या हृदयाशी बोलू लागत असे. या पत्रांतून त्यांचे स्त्रीजीवनविषयक क्रांतिकारी विचार मुलींच्या वाचण्यात यावेत म्हणून ही पत्रे प्रसिध्द करण्याचा मोह आवरता आला नाही.

शिक्षणाच्या दृष्टीने स्त्री व पुरुष यांच्यात कुठलाही भेद करु नये, ते समान भूमिकेवर असावेत असे त्यांचे प्रतिपादन असे. कुणी कुणालाही लहान मोठा समजू नये. गुणविकास हे शिक्षणाचे साध्य असल्याने समानता हाच गुणविकासाचा आधार होऊ शकतो म्हणून स्त्रीला, स्त्री या नात्याने, नागरिक या नात्याने व मनुष्य या नात्याने शिक्षण देणे आवश्यक आहे असे शिक्षणशास्त्रज्ञांनी मानले होते..

स्वयंपाकगृह व सुतिकागृह हे स्त्रियांचे कार्यक्षेत्र असून रणांगण हे पुरुषाचे कार्यक्षेत्र, अशी सर्वसाधारण लोकांची समजूत झालेली आहे. ही सर्व कार्यक्षेत्र कुठून आली ? केवळ शरीराच्या घडणीमुळे स्त्री सतत स्त्रीच राहिल आणि पुरुष हा नेहेमी पुरुषच राहील काय ? दोघे गिळून मनुष्य कधी होणार नाहीत काय? एका लेखकाने लिहिले होते स्त्रीला कार्लप्रमाणे मील मध्ये घोळा कि मार्क्स मध्ये तळा, शेवटी स्त्री ही स्त्रीच राहिल गुलासाठी तलवार व गुलीसाठी बाहुलीचे खेळणे, हा त्याचा पुरावा आहे. स्त्रीची आकांक्षा मातृत्व व पुरुषांची युध्द यात शिक्षणाद्वारेच क्रांति घडवून आणता येईल असे दादांना वाटत असे.

स्त्रीला मातृपदाशिवाय स्वतःच्या व्यक्तित्वाचे मूल्यच नाही काय? ज्या अर्थाने स्त्री शरीर धन मानली जाते, त्या अर्थाने पुरुष हा शरीरधन नाही. पुरुषाच्या हाताला, त्याच्या पराक्रमाला व श्रमाला किंमत आहे परंतु स्त्रीच्या बाबतीत तिचे रुप हीच मोलाची वस्तू आहे. ही स्थिती जोवर राहिल, तो पर्यंत स्त्री ही सांभाळण्याची वस्तू राहील. साठ वर्षांची वृद्ध स्त्री दहा वर्षांच्या

मुलाला पुरुषाची सोबत मानते, ही वस्तू स्थिती का आहे याचा विचार करणे अत्यावश्यक आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी प्रत्येक स्त्रीने आपले रक्षण आपणच करावयास शिकले पाहिजे. शरीर बलावर आपली अब्रू अवलंबून असता कामा नये. बलात्काराने स्त्री भ्रष्ट होते ही समजूत सर्वथा गैर मानली पाहिजे. स्त्रीला आत्मरक्षणक्षम बनावयाचे असेल तर तिचे शरीर क्रय–विक्रयाची वस्तू असता कामा नये. नाजूकपणा पुरुषांसाठी दोषरुप ठरत असेल तर स्त्रियांसाठी ही ठरायला पाहिजे.

गांधीजीनी स्त्रीला जीवनदान दिले ते स्त्रियांना रक्षणाकांक्षी ठेऊ इच्छित नव्हते. स्त्रियांनी रुपजीवी, शरीरजीवी राहू नये असे त्यांना वाटे. स्त्रीचे जीवन नव्या प्रेरणांनी, नव्या स्फूर्तीने, नव्या आशा–आकांक्षानी सजीव करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. अबला म्हणवून घेणाऱ्या स्त्रीला देखील, त्यांनी पुरुषार्थाचा संदेश दिला. म्हणून नारीजीवनाची प्रचलित मूल्ये बदलण्याच्या कामाला देखील त्यांना सुरुवात करावी लागली. स्त्रिया दुबळ्या असूनही त्यांच्या माथी उखळ–मुसळ मारले जाई, दळणकांडण, चूलमूल इ. सारी घरकामे स्त्रियांच्याचसाठी नसावीत. महादेवभाई देसाई आश्रमात आले, तेंव्हा म. गांधीनी त्यांना स्वयंपाक करायला लावले. प्यारेलालजीनाही त्या दिव्यातून जावे लागले असल्याप्रकारच्या उपयुक्त शरीर श्रमांना आजवर समाजात प्रतिष्ठित मानले गेले नाही म्हणून या श्रमांची प्रतिष्ठा वाढविली पाहीजे, त्यावाचून आम्हाला स्त्रियांना समानभूमिकेवर आणता येणार नाही.

आज्ञापालन व पतीसेवा हाच स्त्रीने आपला धर्म मानल्यामुळे ती पुरुषासाठी एक सांभाळण्याची वस्तू होऊन बसली व व्यापक समाजातही एक समस्या ठरली, या दुहेरी सामाजिक प्रश्नाचा विचार गांधीजींनी केला होता. एकीकडे विधवेच्या केशवपनाला विरोध आणि दुसरीकडे सधवा व कुमारिकांना केशवपनाचा सल्ला, एकीकडे विधवाविवाहाचे प्रतिबंध उठविण्याचे समर्थन व दुसरीकडे नवपरिणितवधू वरांनांही ब्रह्मचर्य पालनाचा आग्रह व संयमाची शिकवणूक. गांधीजींच्या या विसंगत गोष्टीतही संमति व सामंजस्य आहे, आणि त्यात क्रांतिकारी विचारांचे बीजही सामावलेले आहे.

गांधींनी विधवेच्या कुरुप करण्याच्या पध्दतीला विरोध केला पण ते स्त्रीची शरीर परायणता व रुपनिष्ठा नष्ट करु इच्छित होते. तिच्या त्यागवृत्तीचे व आत्मसमर्पणाचे चीज करु इच्छित होते. तिची कार्यप्रवणता वाढवून स्त्रीपुरुषांना समान पातळीवर आणण्याचा प्रयत्न करीत होते. स्त्री पुरुषांची नैतिक भूमिका एकच असावी असा गांधीजींचा आग्रह होता. त्यांनी

आपल्या आश्रमात मुलींमध्ये अशी भावना निर्माण केली होती की, आम्ही आपले शरीर विलासप्रिय पुरुषाला खेळणे म्हणून वापरु देणार नाही. केवळ सौंदर्यलोलुप पुरुषासाठी प्रदर्शनाची वस्तू होण्यात आम्ही आपल्या जीवनाचे सार्थक मानणार नाही. आमचे शरीर आम्हाला कार्यक्षम बनवावयाचे आहे. स्त्रीचा उध्दार पुरुष करु शकणार नाही, तो स्त्रीलाच करावा लागेल. स्त्रीच्या पोटी जन्मणारा बाणेदारपणा आणि देखणेपणा, काटक व सुदृढ शरीर हे गुण मुलांप्रमाणे मुलीला देखील भूषणभूतच आहेत.

लज्जा व भीरुता हे गुण स्त्रियांनी आपली भूषणे मानली. त्यामुळे त्यांना मोकळेपणाने जगता येत नाही. त्या जन्मभर भीत भीत लाजत लाजत जगतात. हीच स्त्री जीवनाची मूलभूत समस्या आहे. दृष्टांचा व गावगुंडाचा प्रतिकार करण्याची धमक तिच्या अंगी आली पाहीजे. स्त्रीला पुरुषाबरोबर मोकळेपणाने राहता यावे म्हणून परंपरागत हाडीमाशी खिळलेल्या समजुतींना दूर सारावे लागेल. आजपर्यंत स्त्रीने कुटुंबाच्या मर्यादित क्षेत्रात स्त्रीच्या प्रेमाचे चमत्कार दाखविले पण आता समाजाच्या व्यापक क्षेत्रातही स्त्रीच्या प्रेमाचे तेज, पराक्रम व माधुर्य दाखविले पाहिजे, अशी अपेक्षा आहे. घरामध्येही मुलीला सतत तुला दुसऱ्याच्या घरी जावयाचे आहे असे सांगितले जाते व लहानपणापासूनच तिच्यावर विवाहाचा संस्कार ठसविला जाते, त्यातून तिला मुक्त करावे लागेल जीवनाची संपन्नता आणि संपूर्णता सहजीवनात आहे हे खरे, पण ते सहजीवन स्त्रीपुरुषाच्या परस्पर निर्भय प्रेमावर आधारित असावे लागेल.

यांतील कांही पत्रे कै. दादा धर्माधिकारी यांनी कै. जमनालाल बजाज यांच्या कनिष्ठ कन्या कु. ओम बजाज [आता श्रीमती ओम अगरवाल] यांना लिहिलेली आहेत. कु. ओम बजाज, दादांची कन्या उषा धर्माधिकारी उषा गंगाधरराव तामस्कर] यांची जीवश्चकंठश्च मैत्रिण होत्या. त्यामुळे त्या पत्रातून वारंवार त्यांचा उल्लेख आलेला आहे. या पत्रांचा कालावधी इ.स. १९३५ ते इ.स. १९४० च्या दरम्यान आहे. त्या काळातील मुलींची शिक्षणाची आकांक्षा सामाजिक स्थिती व स्वातं याच्या आंदोलनाच्या विविध चळवळींचे उल्लेख याची माहिती खरोखरच उपयुक्त ठरेल. कांही पत्रे बबाताईमुळे दादांच्या परिवाराशी मुलीच्या भूमिकेवरुन समरस झालेल्या मुलींना लिहलेली आहेत.

त्यावेळेस दादा बजाजवाडीत राहात. बजाजवाडी म्हणजे त्यावेळी भारतीय राष्ट्रीयत्वात जी दिव्य तत्वे सामावली होती, जे जे कल्याणकारी

भाव होते. जे पावित्रयुक्त माधुर्य होते. त्या सर्वांचेच पुण्यक्षेत्र होते. बजाजवाडीत आणि वर्ध्याला, निरनिराळ्या प्रांतातून आलेल्या कार्यकर्त्यांची कुटुंबे काही प्रमाणात एकाच संयुक्त कुटुंबाप्रमाणे राहात. त्यामुळे तेथे राहणाऱ्या कुटुबांना, तेथील व्यक्तींच्या जीवनाला आंतरजातीय, आंतरप्रांतीय व्यापकत्व प्राप्त झाले होते. जीवन प्रांजळ असावे, त्यात गुप्तता नसावी अशी म. गांधीची शिकवण होती. बजाजवाडीचे सारे वातावरण एका विलक्षण सुरभित्वाने व सुभंगत्वाने समृध्द झाले होते व त्यात गृहस्थाश्रमाचा त्याग न करता कौटुंबिकतेची भावना सामावलेली होती.

आज कुटुंबनिष्ठेचे अधिष्ठान ढासळते आहे. कुटुंबातील प्रेम, विश्वास व परस्परावलंबन याचा ऱ्हास होत आहे, कुटुंबाबाहेरील स्त्रीपुरुष संबंधाला अधिष्ठान उरले नाही. अशा वेळी स्त्रीपुरुष संबंधातील शुचितेचे, सुभगतेचे रक्षण कसे करता येईल हा यक्षप्रश्न आहे. अशा रीतीने आपण आजदेखील अनिष्ठेच्या व सार्वत्रिक संशयवादाच्या वातावरणात वावरत आहोत. भावनांचा घोटाळा आहे, आकांक्षांचा गोंधळ आहे, मानवी जीविताच्या शाश्वत अधिष्ठानाचे भान कमी कमी होत आहे अशा काळात ही पत्रे वाचल्याने तरुणींच्या मनात नवजीवनाची प्रसन्नता व चैतन्य निर्माण होईल अशी आशा आहे.

दादा नेहमी म्हणत असत, मी आता या निष्कर्षाप्रत येऊन पोहचलो आहे की नियतीने आणि ईश्वराने स्त्रीच्या व्यक्तित्वाला कुलुपात बंद करुन टाकले व गुपचुप स्त्रीच्या पदरालाच ती किल्ली बांधून ठेवली आहे. आणि स्त्री मात्र जगभर भिरभिरत्या नजरेने त्या किल्लीचा शोध घेत आहे. केवळ आपला अंतर आात्मा सोडून !

– तारा धर्माधिकारी

निबंध
बा. क्र. 3823
२२६४९
१०।१।८२

मुंबई
दि :– १४–३–१९७२

*प्रिय मुली,*

तुझे मोकळया मनाने लिहिलेले पत्र मिळाले, फार गोड आहे. सर्वांनी मिटक्या मारीत वाचले व वाखाणणी केली. माणूस स्वतःला जेव्हा उकलून दाखविते तेव्हा त्याचे प्रांजळ स्वरुप फारच मोहक असते. शक्य तितके मोकळे राहावे. लपविण्याचा प्रयत्न करु नये म्हणजे कुढायला होत नाही. आई वडिल यांच्यावर लोभ ठेवावा. पण त्यांच्याजवळ बोलायला घाबरु नये. मर्यादा आड येते म्हणून मैत्रिण हवी असते तिच्याजवळ बोलता येते. मैत्रीत मानापमान नसतो. गट्टी फू किंवा कट्टी वगैरे पोरकटपणाचे प्रकार आहेत. क्षणात गट्टी तर क्षणात कट्टी त्यात मानापमान नसतो. खऱ्या मैत्रीत मतलबही नसतो आणि शिष्टपणाहि नसतो. अशी जिवाभावाची मैत्री हवी. मग कुणी मतलबी म्हटले तरी खट्टू होऊ नये आणि शिष्ट म्हटले तरी बुजून जाऊ नये. सगळ्यांशी प्रेमाने वागावे. आपले खरे स्वरुप लोकांना कळू लागते. जे खरे आहे ते फार काळ झाकलेले राहात नाही. मुलांच्या बाबतीतही सहजतेची वागणूक राहिली पाहिजे. मुलांचा आधार शोधण्याची गरज भासू नये आणि भीतीही वाटू नये, अशी मुलांची मनःस्थिती असेल तरच हे साधते. बरोबरीच्या मैत्रिणींचीही फार गरज असते. त्यांच्याशी भांडणेही होतील, भांडण हा देखील मैत्रीचाच भाग आहे. It is all in the game.

प्रौढपणाचा आव तर मुळीच आणू नकोस. आव कशाचाच आणू नये. आव आणणे म्हणजे जे नाही त्याची बतावणी करणे. उसने जीवन त्यात दिखाऊपणा असतो. ते जीवन बनावट,नकली तकलुपी असते उडया मारणे, उनाडणे, बालवृत्तीने राहणे, हे स्वाभाविक असेल तर त्याचे मोल फार मोठे आहे. गंभीरपणाचा मुखवटा लटका असतो. बालवृत्तीची खंत वाटण्याऐवजी भूषण वाटावे. धावण्यात काय चुकले?

तू काही बनण्याच्या भरीस पडू नकोस. बेटा, मी काही सांगितले तर तसे बनावेसे वाटेल. सारी बनवाबनवी होईल मुळातील अस्सल तू [ चुनिया ] हरवून जाशील. सारे जीवन लटके, थोटे होऊन जाईल. स्वतःला काय वाटते, ते पहा. ते खरे ! परिक्षेची भीती वाटणे, मुलांची भीती किंवा फाजील महत्व

वाटणे, वडिलांच्या वशिल्यावर खपणे हे सारे तुला खुपते ना, टोचते ना? मग जे बोचते ते नकोसे वाटते, ते करु नये? मग इतर कुणी कशाला सांगायला हवे? परिक्षेला भ्याले की ती आपसूक वठणीवर येते. गल्लीतल्या मैत्रिणीशी अबोला सहन होत नाही ना मग मैत्रिची गरज आपल्यालाच आहे, हा काय दुर्गुण थोडाच आहे, याला कुणी मतलबीपणा म्हटले तर म्हणोत बापडे!

मुख्य गोष्ट म्हणजे कुणी काही सांगितले त्याप्रमाणे करण्याचा सपाटा चालवू नको. त्यात धोकाच धोका आहे. मारुन मुटकून काही बनण्याचे ठरवू नकोस. जे टोचते,खुपते,बोचते त्यातून कसे बाहेर पडता येईल ते तुझे तुलाच कळू लागेल. त्यात जिव्हाळयाच्या माणसाजवळ, मन मोकळे करुन मदत घ्यावी. तुला पत्र लिहावेसे वाटले म्हणजेच लिहित जा. लिहीले पाहिजे म्हणून लिहू नकोस.

तुझा

दादा

[ कै. दादा धर्माधिकारी यांनी आपली नात अरुणा धर्माधिकारी, श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी यांची कन्या – आता डॉ. सौ. अरुणा पाटील हिला लिहिलेल्या पत्रातील कांही भाग ]

गांधी सेवा संघ,
ता. २२–११–१९६५
वर्धा

*प्रिय मुली,*

तू लिहितेस की तुझ्या शाळेतील अंगणात सतत क्रीडामग्न असणारी वृक्षवेली, आणि पानेफुले तुझी सतत थट्टा करित असतात आणि शिकवित असतात की कोरे कागद काळ्यानिळ्या शाईने भरणे विद्यार्जन नव्हे! हा तुझा विचार खरोखरच महत्वाचा आहे. वृक्ष पाने, फुले, निर्झर, पहाड आणि शेते यांनाच पुस्तक समजून त्यांच्यापासून धडा शिकणे, हाच खरा विद्यार्जनाचा सर्वश्रेष्ठ मार्ग होय आणि यातच खरे कौशल्यही आहे. परंतु मी तुला आणखी एक गोष्ट सांगणार आहे. तू अजून बालिका आहेस. तुझे सारे जीवन कोऱ्या कागदाप्रमाणे स्वच्छ, पवित्र आणि उज्ज्वल आहे आणि त्यात तुला रंग भरावयाचे आहेत. हे करतांना तुला आधिकाधिक सावध राहिले पाहिजे. जीवन रंगीत बनविणाच्या नादात, प्रयत्नात असतांना त्याची उज्वलता, पावित्य व शुभ्रता यांची थोडीशी देखील हानी होऊ नये याची काळजी घ्यावी लागेल. वृक्ष, पाने, फुले हिरवीगार आहेत, आनंदाने डोलत आहेत. पण ही त्यांची सारी मस्ती, सारा आनंद दुसऱ्यांसाठी आहे. दुसऱ्यासाठी ते साऱ्या आनंदाचे समर्पण [उत्सर्ग] करित असतात. आणि हा सर्मपणाचा धडा हाच आपल्या निसर्गाचा अनमोल ठेवा आहे.

आता उत्तर देण्याची पाळी तुझी आहे. तुझ्यासारख्या लाडक्या मुलींची गोडपत्रे हाच माझ्या जीवनाचा आनंदाचा ठेवा आहे.

तुझा –
दादा

गांधी सेवा संघ
ता. २७-२-१९३६
वर्धा

*प्रिय मुलींनो,*

तुमच्या शद्वात दगडालाही पाझर फोडण्याची शक्ती आहे. साधेच शद्व पण वाचल्यावर हृदयाचे पाणीपाणी झाले आणि ते डोळ्यावाटे वाहू लागले. दगडासारख्या छातीच्या वीरांच्या खड्गात जे सामर्थ्य नाही ते तुम्हा सुकुमार मुलींच्या साध्या शद्वात आहे.

तुझा एक डोळा आंधळा झाल्याबरोबर डॉक्टराने तुला दोन नवीन डोळे दिले हे काय त्या बिचाऱ्याचे थोडे उपकार झाले? आंधळा मागतो एक डोळा, अन् देव देतो दोन, आणखी काय पाहिजे? बरे पण औषधोपचार अगदी बरोबर चालला आहे ना? त्यात चुकू नकोस, नाहीतर मग एवढया मोठ्या माणसाची मुलगी असलीस तरी कोणी फुकट देखील विचारणार नाही, हे पक्के लक्षात ठेव. पू. माताजींना मोठी फिकीर वाटते की आता मुलीचे कसे होईल? मी त्यांना सांगितले की आता तर मुळीच काळजीचे कारण नको. मुलगी अगदी चष्मेवाली विदुषी होऊन येणार आहे. फक्त तेथील हवेचा परिणाम तुझ्या वर्णावर होऊ नये म्हणून रोज थोडी थोडी हळद पीत जा म्हणजे झाले.

पापांच्या संगतीचा लाभ तुम्हाला मिळतो हे मोठेच भाग्य, नाहीतर त्या जिवंत कोळशाच्या खाणीत तुम्हाला अगदी गुदमरल्यासारखे झाले असते पण कोळश्याच्या खाणीतच हिरे होतात, हे सत्य माहित आहे ना तुला, मुली? नाही म्हणता म्हणता, या खाणीतच काकाजींना एखादा कोहिनूर सापडावयाचा? नाही कोणी म्हणावे? सावळा वर बरा हे त्यांचे तत्वच आहे.

तुझी आरशी तुझ्या कान, नाक व डोळ्यावरच स्वार होण्यात जास्त आनंद मानते हे स्वाभाविकच आहे. आरशी आणि शिक्षण यांचा मोठ्या जिव्हाळयाचा संबंध आहे. शानदार पातळ, फाऊंन्टनपेन आरशी अशा थाटाने

बाहेर पडलीस म्हणजे मग डौल काय विचारावा? एखाद्या प्रोफेसरीणबाई सारखीच दिसशील!

तुझा
दादा

वर्धा
ता. ३–३–१९३६

*प्रिय मुली,*

तुझे साधेच पण फार दिवसानी आलेले पत्र गोड वाटले. मुलींच्या आयुष्यात असा एक काळ येतो की आईबाप बोटभर चिठ्ठीला देखील महाग होतात. तुझा तो काळ जवळ असला तरी अजून अवकाश आहे.

तुझ्या साध्या पत्राला साधेच उत्तर देणार आहे. मौन काही मला साधत नाही पण शब्द वल्गना बहु न करावी हा नियम पाळण्याचा, प्रयत्न मात्र करुन पाहणार आहे.

येथे आजाराच्या प्रयोगाकरीता दरेकाने आपापला आवडीचा विषय निवडला होता. बिचारा जयप्रकाश नवमतवादी म्हणून त्याला नवीनच व्याधीने सतावले. पू. किशोरलालभाई बरे आहेत. आता आपण बरे झालो हे जाहीर करण्याकरिता पू. बापू सकाळी इकडे फिरावयास येऊन गेले. पू.राजेंद्रबाबूही बरे आहेत. पू. विनोबा काल खानदेशात गेले.

पू. काकाजींची [जमनालालजी बजाज] दिनचर्या यथापूर्ण चालू आहे. परिचय, भेटी, कानगोष्टी पत्रव्यवहार आणि सभा–इतके करुनही त्यांचे डोके जाग्यावर कसे राहते याचेच मला राहून राहून आश्चर्य, कौतुक आणि हेवा वाटतो. बबीला तुझी पदोपदी आठवण येते. तुमच्या आईला होते यात नवल नाही. आईचे हृदय म्हणजे उदात्त भावनांचा अखंड झरा!

पत्र लिहीता लिहीता उघडया पुस्तकातील खालील ओळ दिसली :– मोलाने प्रेम मिळत नाही. त्याचप्रमाणे प्रेमालाही मोलाची तहान नसते. हे सर्व जो प्रेम करतो. त्याला पटते ज्यावर प्रेम असते, त्याला त्याचे काय? एक मोलकरीण आपल्या मालकाच्या चिमुकल्या मुलावर, बालकावर प्रेम करीत होती, तिचे हे उद्गार आहेत. आईबापाचे प्रेम अगदी असेच असते. तेव्हा तुझ्यावर काही जबाबदारी नाही. तुला आवडेल तशी तू वाग. आम्ही आपल्या

हृदयधर्माप्रमाणे वागू. देव तुझी वृत्ति पवित्र, हृदय निष्पाप व बुध्दि शुध्द ठेवो!

तुझा
दादा

खद्रसंस्थानम्,
बेझवाडा,
दि. २२–६–१९३६

*प्रिय मुली,*

खद्दर संस्थानम् बेझवाडा. हे संस्थान, म्हणजे वसाहत प्रत्यक्ष किल्यासारखी, नसली तरी बाहेरच्या लोकांना तितकीच दुर्गम आहे. संस्थानाच्या आवाराला लागूनच एक खंदकासारखा नाला आहे, तो पार केल्यावाचून कोठेही जाता येत नाही. या नाल्याच्या पलिकडे जाण्याकरीता एक विचित्र नाव आहे. ताडाच्या झाडांची दोन पोकळ खोडे घेऊन त्यावर फळ्या ठोकलेल्या आहेत. या नावेत बसून छोटयाश्या नाल्यातून जाताना गिरीधर कविरायांचा नैया मोरी तनिकसी या शब्दांची आठवण झाल्यावाचून राहीली नाही. मीही आपल्या जीवनाच्या अत्यंत अरुन्द क्षेत्रात आपली नाव अशीच सोडली आहे. पण माझी नाव इतकीसुध्दा चांगली नाही. तुम्ही मुली पाण्यात लहान लहान कागदाच्या नावा टाकत होता ना? बस्, अगदी तशीच माझी नाव आहे. तरंगेल तोपर्यंत तरंगेल, नाहीतर समुद्रास्तुप्यन्तु आहेच.

जेवणाच्या बेतात फरक एकच की येथे सर्व ब्राम्हण खादीधारी जेवणाच्या व वाढण्याच्यावेळी सोवळी व धाबळया नेसतात. बहुतेक जुने कार्यकर्ते सर्व आपल्या प्राचीन ब्राह्मणांप्रमाणे शिवून तयार केलेले कपडे निषिध्द मानतात. आधुनिक Tailor made gentlemen पोषाखी माणसे एकूण या प्रांतात कमीच. जेवणाला बेणे तांदळाचा भात व चपात्या होत्या. भात साधारण बरा असतो पण प्रत्येक वस्तूत खडे किंवा वाळू असलीच पाहिजे असा येथील मंडळीचा आग्रह दिसतो. ब्रम्हपदी नाचण्याकरिता जर लोखंडाचे चणे खावे लागतात तर त्यांनी काय राष्ट्रीयमोक्षासाठी साधे खडे खाणेही लोकांना शिकवू नये काय? स्वतः खडे खातील तेव्हा कोठे शत्रूला खडे चारण्याची शक्ति येईल! अन्न कसेही असले तरी पत्रावळी मात्र अगदी सुई दोऱ्याने शिवल्यासारख्या असतात.

बहुतेक मंडळी दोन्ही वेळा स्नान करुन भस्म लावतात. आपल्या आचरणाने, सतत उद्योगाने व भस्मधारणाने अभेदं भस्मान्तं शरीरम् या

श्रुतीवचनाची जणू काही आठवणच देत असतात. या प्रांतातील चळवळीचे प्राण श्री. सीताराशा गारु तर प्रातःस्नान करुन अगदी शुध्द वेदोक्त पध्दतीने वेदघोष करतात. बिचाऱ्याचा चेहरा अगदी थेट एखाद्या फणसासारखा आहे. फणसाइतकाच निराकार आहे. पण आतून फणसाप्रमाणेच रसाळ आहे, पण त्यात गरे आणि रस असला तरी त्याचा दर्प व उग्रपणा मात्र नाही.

काल सांयकाळी पुन्हा नावेतून फिरावयास गेलो होतो. तेथून जवळच एक टेकडी आहे. तिच्याकडे पाहूनच चढायला पाय वळवळ करायला लागले. मदनपल्लीला तुम्हा दोघींबरोबर असताना आपण एका टेकडीवर चढलो होतो तो बहारीचा प्रसंग आठवला व याबरोबरच सुमित्रानंदन पंतांच्या बालिका मेरी मनोरम मीत्र थी या ओळीचीही आठवण झाली. नावेत सुंदर संगीत चालले होते, पण माझे मन टेकडीकडे पाहून पाहून जुन्या आठवणी काढण्यात मग्न झाले होते.

काल दुपारी दोनपासून सभा सुरु झाली. अध्यक्ष दे. भ. कोंडाव्यंकटप्पय्या पंतळु हे वृध्द गृहस्थ होते. चार पाच भाषणे झाली इकडील वक्तृत्व काही औरच आहे. बंगाली वक्त्यांच्या भाषणातील आरोह अवरोह व एकंदर ऐट गंभीर घनगर्जनेसारखी असते. मेघांच्या गडगडाटात ही विद्युल्लतेची चमक असते. या प्रांतातील वक्तृत्वाचा मुख्य गुण अस्खलितपणा हा दिसतो. बोलतांना कोणीसुध्दा अडखळत नाही. गतीची कमाल आहे. या तोंडाच्या टकळीची गती जर का माझ्या सुताच्या टकळीला प्राप्त झाली तर सत्यव्रतन बुध्दिसेन व दत्तोबा खिरापत वाटतील आणि आता आपली धडगत नाही म्हणून कापडाच्या गिरण्यावाल्यांची धाबी दणाणतील. एक ६१ वर्षाचा गृहस्थ बोलू लागला तेव्हा तर मला एखाद्या डोंगरी ओहोळाच्या धबधब्याचा भास झाला. त्या धबधब्याच्या धाराप्रमाणेच ताडताड त्यांचे शब्द सारखे अविच्छिन्न गतीने पडत होते. धबधब्याप्रमाणे त्यातही विजेची शक्ती होतीच.

आज दरेकाने आपले सार्वजनिक चरित्र सांगितले. दिसायला बावळट व साधी दिसणारी ही माणसे मोठीच पुरुषार्थवान दिसतात. त्यांच्या दृष्टीने माझे आयुष्य तर अगदीच अळणी पराक्रमशुन्य व घटनाहीन (uneventful) वाटते. शहरात रंगीबेरंगी बल्बस् मधून प्रकाश देणारे विजेचे दिवे पुष्कळ असतात. एक बटण दाबले की ते प्रकाशतात व पुन्हा तेच दाबले की ते विझतात. पण हे कार्यकर्ते त्यातील ज्योतीसारखे आहेत. विजेच्या दिव्याप्रमाणे लखलखाटही नाही आणि ते कोणाचे डोळेही दीपवित

नाहीत व दुखवित नाहीत. ओबडधोबड शरीरात त्यांच्या आत्म्याची दिव्य ज्योत पाऊस आणि वारा सहन करीत लुकलुकते. ही माणसे अमृताची भांडी आहेत. एखाद्या विलासी राजाच्या रंगमहालात मद्याची भांडी, सोन्याची, चांदीची व रत्नांची असतातं. पण वरुन ती कितीही सुंदर असली तरी त्यात दारुसारखी मादक वस्तू असते हे विसरता कामा नये. पण एखाद्या गरीबाच्या झोपडीतील मटक्यातही अमृत राहू शकते. शहरातील पोषाखी गृहथ (Tailor made geantlemen) हे मद्याने भरलेली रत्नाची भांडी असतील तर हे साधे भोळे कार्यकर्ते अमृताची मडकी आहेत. का गहिय का परिहरिय कहहु करिय विचार? असा तुम्हा मुलींना माझा प्रश्न आहे.

लोकसेवेसाठी सर्वस्वाचा त्याग करुन नि:संग झालेल्या माणसांकरिता एक निवाऱ्याचे, विश्रांतीचे व सुखाचे स्थान निर्माण करणे ही एक मोठी देशसेवा आहे ही गोष्ट हे या देशातील मुलींना केव्हा कळेल?

नाही म्हणायला हिंदीचा प्रचारही थोडाफार झालेला आहे. आमची भाषणे या मंडळींना व त्यांची आम्हाला समजाऊन देणारे तेलगु गृहस्थ तीन चार आहेत. त्यात एक पंधरा वर्षाचा मुलगा मोठा चुणचुणीत आहे. त्याने एका हिंदी पुस्तकाचे तेलगु भाषांतर केले आहे व एका तेलगु पुस्तकाचे हिंदी करीत आहे. नाव आहे शिवराम शास्त्री.

या संस्थानाचे संस्थापक व संचालक मोठे उत्साही व कर्तबगार दिसतात. सर्वच लोकांनी आपली आत्मकथा सांगितली. ते शरीरयात्रा वर्णन नव्हते. खरोखरच ते आत्मकथन म्हणजे आत्मविकासाचे वर्णन होते. बिचाऱ्या संस्थापकाने अशी तक्रार केली की काय करावे बायकांची सोन्याची हाव काही कमी होत नाही. येथील स्त्रिया अगदी सर्वांगावर दागिने घालतात. गाल टोचून त्यात काही घालण्याची सोय नाही याबद्दल त्यांना वाईट वाटते. कपाळावर दागिने घालता येत नाहीत म्हणून शक्य तितके मोठे कुंकू लावतात. पडद्याच्या अभावी दागिने व मोठे कुंकू काजळ वगैरे वस्तूंच्या सहाय्याने आपले तोंड लपविण्याचा इतका प्रयत्न केल्यावरही त्यांचे चेहरे दिसतातच. याला त्यांचा इलाज नाही. मारवाडी आणि गुजराथी तर दातांना सुध्दा सोनेरी बनविण्यास कमी करीत नाहीत. बिचाऱ्यांची मने धातूप्रमाणे घनीभूत झाली नाहीत हे मोठेच भाग्य म्हटले पाहिजे. गरिब लोकात खोटे दागिने घालण्याची पध्दत आहे. खोटे का होईना पण दागिने घालून श्रीमंतीचा डौल आणलाच पाहिजे असा प्रयत्न आहे. तू नाही का इंग्रजीचे सोंग आणण्याचा प्रयत्न करीत? मग बबन तुझी Yes, No करीत नक्कल

करीतो, हेही तसेच आहे. येथे कोकिळेच्या रंगाच्या स्त्रिया कमी आहेत, पण मैनेच्या रंगाच्या मात्र आहेत. आणि म्हणून मैनेचे अनुकरण करण्याकरिताच की काय त्या आपल्यां पायांना व अंगाला खूप हळद लावतात. पी हळद नी हो गोरी च्या ऐवजी लाव हळद नी हो गोरी हा नियम दिसतो. पण नीले मे पीला मिला, रंग हरा बना हे सूत्र बिचाऱ्यांना माहित नसावेसे दिसते ! पूर्वी जे पुरुष अंगाला रंग लावित असत त्यांना आपण जंगली म्हणत होतो, पण तुम्ही बायकांनी दागिन्यांची बालिश हौस दाखविली किंवा अंगाला रंग फासला आणि मोहरमच्या वाघाप्रमाणे मेहंदीची चित्रे काढली तरी तुम्ही मात्र सुसंस्कृतच ! मात्र येथे पुरुषातही दागिने दिसतात. खुद्द या संस्थानच्या संचालकांच्या कानात बाळ्या आहेत. एका गृहस्थाच्या तर नाकातही आहे. रंगाचा शोकही खूप आहे. गुलाबी व लाल रंग मोठा लोकप्रिय दिसतो. शिकले सवरले लोकही गुलाबी धोतरे नेसतात. व लाल भडक सदरे घालतात. डॉक्टर, वकील, बॅरिस्टर देखील तुझ्या पातळाच्या काठाप्रमाणे मोठमोठ्या लाल व हिरव्या काठाची सुती धोतरे वापरतात.

या संस्थानंत चलन पध्दतीचा एक नवा प्रयोग चालू आहे. नाण्याच्या चलनाऐवजी येथे वस्तु विनिमय (Bater System) पध्दतीचा प्रयोग सुरु आहे. हल्ली आपल्याला हुंडी किंवा नोटेचे रुपये मिळतात. त्या ऐवजी धान्याच्या नोटा चालतात. आजच सकाळी येथील एका कार्यकर्त्याच्या मुलाचे नामकरण झालं. त्याप्रसंगी त्याने अकरा पोती तांदुळ दान म्हणून दिले व अकरा नोटा अध्यक्षांच्या स्वाधीन केल्या. या परिषदेत नामकरणाचे प्रयोजन काय असा प्रश्न करु नकोस. वेडे पोरी हा तर मुख्य रचनात्मक कार्यक्रमच आहे. सावलीला नाही का लग्न झाले मग येथे निदान नामकरणही नको काय? आजचा यज्ञ विवाह आहे आणि अनेक प्रसयिष्यधाम् ही धर्माज्ञा आहे. Commandment आहे. पण ही थट्टा बाजूला सोडली तरी हे विधी अशा पध्दतीने व अशा प्रसंगी झाले तर पुष्कळच सुधारणा अनायासे घडून येईल.

एक लहानसे ग्रामोद्योग प्रदर्शनही येथे आहे. त्यातील लाकडाच्या जाळीच्या परड्या, वेलबुट्टीदार लाकडी चमचे व टाक या वस्तू मला आवडल्या. जेवणही ग्रामोद्योगाचे प्रदर्शनच आहे. मला ते आवडतेही. सकाळच्या चांगल्या पोळ्या शंकरपाळ्यासारख्या खुसखुशीत होत्या, पण रात्रीच्या पोळ्या चांगल्या नव्हत्या. भाताचा डोंगर पाहून तर कंबरच खचली. आमच्या मूळतापीला गोवर्धन पर्वताच्या पूजेसाठी त्याची भाताची प्रतिमा तयार करतात तिची मला आठवण झाली. गोकुळचा गोवर्धन श्रीकृष्णाने एका

करंगळीने लीलेने उचलला असेल पण हा पर्वत पाचही बोटांनी उचलायला सांगितले असते, तर तो गर्भगळीत झाला असता बिचारा. श्रीजी म्हणतात, आपण फक्त बोटांनी जेवतो पण घट्ट व पातळ सर्व पदार्थ संबंध हातांनी खाण्याची येथील लोकांची हातोटी काही औरच आहे. नाक काय मुरडतेस? तांदूळ आणि मूग हे येथील लोकांचे फार आवडते पदार्थ दिसतात. स्नानाच्या वेळी अंगाला लावायलाही मूगाचे पीठ आहेच.

शहर व कृष्णा नदीचे पवित्र पात्र पहावयास गेलो. कृष्णा नदी पाहिली म्हणजे तुमच्या आईची आठवण येते व हृदय भरुन येते ! तिचेही नाव कृष्णाबाई [कै. सौ. दमयंती शंकर धर्माधिकारी, धर्मपत्नी] आहे. कृष्णेचे पाणी पवित्र व पौष्टिक आहे. अगदी पारदर्शक आहे. स्फटिकासारखे स्वच्छ आहे. गढूळ नसते. तसेच तुमच्या आईचे मन आहे. ती तर माझी अखंड सहचारिणी आहे.

आपल्या नित्याच्या व्यवहारातील इंग्रजी शब्दांचे संस्कृत प्रतिशब्दही प्रांताप्रांतात निराळे दिसतात. उदाहरणार्थ



Construction Programme = निर्माण कार्यक्रम
Civil disobedience = शासन उल्लंघन
Social Work = सांघिककार्य
Extremists = अतिवादी
Moderates = मितवादी
Report,description = चरित्र
Lecture = उपन्यास

असे या प्रांतात पर्यायशब्द आहेत. राष्ट्रभाषा एक झाल्यावर राष्ट्रीय परिभाषाही एक होईल.

मुलींनो, तुमची आठवण पदोपदी होते. तुम्ही बरोबर असल्यात म्हणजे माझ्यातील सुप्त बालवृत्ती एकदम जागी होते व बालकाच्या अगदी नित्यनूतन दृष्टीने मला सृष्टिच्या सौंदर्याचा आस्वाद व जगाचा अनुभव घेता येतो. लहान मुलांच्या अकलुषित दृष्टिने जीवनाकडे पहाता यावे म्हणूनच थोर महात्मे लहान मुलांच्या संगतीत भान विसरुन जातात. येशूने एकदा असे म्हटले होते की, 'Suffer Little Children to me come unto me and forbid them not; for of such is the kingdom of Heaven' याचाच हा नवा अर्थ आहे. देव मला बालकाची निर्मळ दृष्टी, त्याचा ताजा उत्साह व कधीही तृप्त न होणारी जिज्ञासा दे असा याचा

अर्थ आहे. बालिका मेरी मनोरम मित्र थी !

तुम्ही नसला तरी श्रीजी आहेत ते काही अगदी रखरखीत वाळवंटासारखे नाहीत. त्यांची भूमिका तत्वजिज्ञासु चिकित्सकाची असली व बुध्दिमत्ता विदारक आणि विश्लेषणशील असली तरी सहृद्यता असीम आहे. ते जगाकडे कलाकाराच्या किंवा सौंदर्योपासकाच्या दृष्टीने पहात नसले तरी सहृदयतेमुळे त्यांची दृष्टी ज्ञानमय तशीच प्रेममय आहे. ऑलिव्हर गोल्डस्मिथने शाळेतील तात्यापंतोजीचे वर्णन करताना त्यांच्या भोवती जमलेल्या लोकांच्या स्थितीचे खालील वर्णन केले आहे.

"And stock the gazed and still the wonder grew
That one shall head conld contain all that he knew"

गोल्डस्मिथने हे थट्टेत म्हटले आहे, पण मला मात्र श्रीजींच्याबद्दल अगदी मनापासून असे वाटते. इतक्या दुर्बल व जर्जर शरीरात इतका सामर्थ्यवान, इतका उदात्त व इतका साधन संपन्न व निरोगी आत्मा कसा राहू शकतो याचे मला राहून राहून आश्चर्य वाटते. पण त्यात आश्चर्य ते कसले? शरीर बलाच्या असत्यत्वाचा हा पुरावाच नव्हे काय?



पू. गोमती काकूंना मुद्दाम जाऊन सांग की, किशोरीलालभाई खुशाल आहेत. न कळणारी, कंटाळवाणी भाषणे ऐकण्याची शिक्षा ते निमूटपणे व धीरोदात्तपणे सहन करीत आहेत.

तुझा दादा.

वर्धा,
ता. १९/८/१९३६

*प्रिय मुली,*

हल्ली स्वाध्यायो् ध्येतव्यः हा एकच विधी तुझ्यासमोर आहे हे वाचून आनंद वाटला. ब्रह्मचर्याश्रम विद्यार्जनाकरिताच आहे. ब्रह्मचर्येणर्षिभ्यः – ब्रह्मचर्य पालन करुन ऋषीचे ऋण फेडावे ही धर्माज्ञा मुलांप्रमाणे मुलींनाही लागू आहे. विद्याभ्यासातच चित्त लीन रहावे म्हणून ते इतर सर्व विषयांतून काढून घ्यावयाचे असते. विद्याभ्यास व्यसनम् हे व्रत पाळता यावे म्हणूनच आहार विहाराच्या बाबतीत नियम सांगितले आहेत. त्या नियमांपैकीच मौन हांही एक नियम आहे. पण ते एकाच्या बाबतीत पाळावयाचे व इतर सर्वत्र जीभ अगदी बेलगामपणे चालवावयाची असा त्याचा अर्थ थोडाच आहे? तू म्हणशील आता दादाही उपदेश करावयास शिकला आहे, पण तसे मुळीच नाही. मुली, महम्मदाची मात्रा चालली नाही तेथे माझ्या बापड्याचा काय पाड?



पू. माताजींचे वैभव पहावयास मी तेथे नाही याबद्दल वाईट वाटते. कोल्ह्याने आंबट म्हणून टाकून दिलेली द्राक्षे खात चोवीस तास मऊमऊ अंथरुणावर पडून राहण्याची हौस त्या मनमुराद पूर्ण करुन घेत असतील आणि हे सर्व प्रयोगाच्या नावाखाली. स्वास्थ्याचा प्रयोग आहे तेव्हा स्वस्थ पडून रहाण्यापासून तो सुरु व्हावा हेही योग्यच आहे, पण अंथरुणावर पडून रहाणाऱ्या माणसाचे मन जगभर प्रवासाची स्वप्ने पहात असते हे कोणाला माहित नाही? माताजींना म्हणावे पचनशक्ती वाढवून आपला जठराग्नी चांगला प्रदीप्त करुन या म्हणजे त्यात तूप व पुरणपोळ्यांची आहुती टाकू.

नुकतीच एक गाय आपल्या आवारात व्याली आहे. तिचे ते गोजीरवाणे पाडस पाहून मला वाटले आपण त्याला कुरवाळावे, पण मनुष्य प्राण्याबद्दल इतर प्राण्यांचा सुध्दा अनुभव इतका कटु आहे की, त्याच्या हेतूबद्दल त्यांनानेहमीच शंका वाटते. मी पण त्या समाजातीलच एक प्राणी आहे तेव्हा माझा स्पर्श त्या गाईला कसा सहन होईल?

बसू आपल्या आईला म्हणतो, आई मला अमुक गुलगी आवडते, आई विचारते, का? बसू उत्तरतो ती तुझ्यासारखी दिसते म्हणून. माझे हृदय भरुन

येते. मुलींनो, तुमच्या ठिकाणी आपल्या मातेचे दर्शन करण्याची शक्ती देव देवो, या भावनेचा विकास हा सामाजिक जीवनाच्या पवित्रतेचा मूळ पाया आहे.

आता पत्र संपवितो. तुलाही इतर करमणुकीमुळे वेळ नसेल. माताजींच्या सेवेचे सोंग वठवावयाचे असेल. दिवसभर रुचकर पदार्थावर ताव मारुन एकादशीच्या उपवासाची ऐट मिरविता आली तर कोणाला नको आहे. माझ्या शब्दात शक्ती असेल तर आशीर्वाद. तुझ्या आईचा आशीर्वाद. तिच्याही शब्दात सामर्थ्य आहेच.

तुझा दादा.



निबंध
क्र. 3843

वर्धा
ता. २१/८/१९३६

*प्रिय मुली,*

तुझा सर्व वेळ शाळेत जातो हे वाचून पू. माताजींचे अभिनंदन करावेसे वाटत असले तरी शाळेतील मास्तर, विद्यार्थी व विद्यार्थिनीबद्दल सहानुभूती वाटल्यावाचून कशी राहिल? माताजींना मात्र स्वास्थ्याकरिता संपूर्ण स्वस्थता लाभत असेल. याचा अर्थ मलाही त्रास देण्याची शक्ती तुझ्या ठिकाणी आहे असा मात्र मुळीच होत नाही.

तू सबंध दिवस शाळेत घालवितेस म्हणूनच माताजींना उपचारापासून फायदा होऊ शकला, नाही तर त्या बापडीचे पाच तोळे रक्त रोज आटले असते. तेव्हा तू आपल्या वियोगभक्तीने माताजींची सेवा करीत आहेस. एवढी मोठी प्रत्यक्ष सेवा तुझ्या हातून घडत असतांना आया अप्रत्यक्ष सेवेने समाधान मानतात हे तुझे म्हणणे मी कसे कबूल करीन?

काल विनोबा सहज पायधूळ झाडून गेले. अनुसया व राधाकृष्ण [बजाज] यांच्या सहवासामुळे माझेही घर कधीकधी पुनीत होऊन जाते. विनोबांची ती करुणा पियुष दृष्टी आपल्यावर दया व प्रेमाचा अखंड वर्षाव करीत आहे असा अनुभव येतो. विनोबांचे डोळे निस्तेज आहेत असा कोणता डोळस माणूस म्हणेल? संतांच्या दृष्टीत विशेष सामर्थ्य असते. माणसाच्या दृष्टीत भावना व्यक्त होते म्हणून तिचा परिणाम झाल्यावाचून रहात नाही. रागाचे पाहणे व प्रेमाचे पहाणे लहान मुलांना देखील कळते. कासव आपल्या पिलांचे संरक्षण फक्त दृष्टीने करते असे म्हणतात. संतांचे हृदय अधिक शुध्द व भावना अधिक उत्कट असतात म्हणून त्यांच्या दृष्टीत अमृत असते. दृष्टीत दाहकता असते. दुष्टांच्याही भावना विकारांमुळे जास्त जळजळीत असतात. त्यांच्या दृष्टीत दाहकता असते. कोमल फुले पार भाजून जातात. आपल्या सुकुमार मुलांना दृष्ट लागू नये म्हणून आया याच कारणाकरिता जपतात. आपण त्यांना खुळ्या म्हणतो. असतील बिचाऱ्या ! पण साधूच्या दृष्टीत अमृत व खलाच्या दृष्टीत विष असते. याचा अनुभव कोणाला नाही? मुली, माझ्या सारख्याच्या दृष्टीत जग याच कारणाकरिता भित असते का? नेत्ररुपी दोन खिडक्यातून हृदयाचे भाव दिसतात. माझ्या हृदयाचे चित्र ज्यांना माझ्या

डोळ्यांतून दिसते, त्यांनी का घाबरु नये? पण राक्षसाची दृष्टी देखील वाघिणीच्या दातांप्रमाणे त्याच्या पिलांना बघत नसेल म्हणून तुम्ही निर्भय आहात.

काल मदुने [मदालसा नारायण व जमनालाल बजाज यांची ज्येष्ठ कन्या] आमच्याकरिता खोबऱ्याच्या वड्या पाठविल्या. साखर जास्त झाली असे तिने आपल्या आईला लिहून पाठविले. मदूच्या हातच्या असल्यामुळे त्या इतक्या गोड लागल्या असे आपले माझ्या भाबड्या मनाला वाटले. किती अकृत्रिम प्रेम आहे त्या मुलीचे ! या जन्मी तरी मला ईश्वराचे दर्शन होणे शक्य दिसत नाही. पण अशा निर्मल अंतःकरणाच्या निर्हेतूक प्रेमाच्या रुपाने त्याच्या कृपेचा मात्र अनुभव येतो. मला एवढाच साक्षात्कार पुरेसा वाटतो. मागणे लई नाही.

अजूनही मी बंगल्यावर गेलो असता पू. दादीजी आपल्या डोक्यावरील पदर सावरुन पुरुष वर्गावर अविश्वासाचा ठराव पास करतात. तुझ्या आईचा नित्यविधी अव्याहत चालू आहे तिच्यामुळेच ठाकुरकी आहे. नाही तर चांगले धिंडवडे निघाले असते माझ्या अब्रुचे. गृहस्थाश्रमाचा आत्मा ज्या कुडीत राहतो त्या कुडीचे नाव गृहिणीधर्म असे आहे. तू म्हणत्येस बायकांनी चुलीची सेवा सोडू नये म्हणून आम्ही पुरुष स्वयंपाकाची स्तुती स्तोत्रे गातो. ही तर खरी मस्करीच आहे त्यातली. हरीजनांना आपापली कामे हलक्या दर्जाची वाटू नयेत व ती त्यांनी टाकून देऊ नयेत म्हणून त्यांचे महत्व प्रतिपादन करावयाचे व एखाद्या वेळी हौसेने ती कामे करुन दाखवावयाची? तुम्ही फसु नका तुमच्यात अक्कल असेल तर. पण आम्ही आपला कावा काय म्हणून सोडावा? काही सणांच्या दिवशी आपल्या मुलीला वंदन करण्याची नागपूर प्रांतातील महाराष्ट्रीयात चाल आहे. मुलीच्या ठिकाणी जगदंबेची भावना करण्यास मी शिकविले. आपल्या संस्कृतीचा हा दिव्य संदेश आहे.

पत्र फार लांबले कागदाचा तुकडाही संपला. तुझ्याही मातृसेवेत, तालमीत व अभ्यासात अन्तराय नको. तेव्हा आता पुरे.

तुझा
दादा.

वर्धा
ता. २/९/१९३६

*प्रिय मुली,*

तुझे अगदी मौन? मर्जी ! विनोबांचे मौन पूर्वी दोन प्रकारचे असे. संपूर्ण आणि सापेक्ष. सापेक्ष मौन म्हणजे ठरलेल्या वेळात अगदी आपध्दर्म म्हणून कामापुरते बोलावयाचे, आपणहून बोलावयाचे नाही. त्या जातीचे काही तुझे मौन दिसत नाही. दुसराही मौनाचा प्रकार आहे. तो म्हणजे भनसाळी आईजी पू. बापूशीच काय ते ठराविक वेळी बोलावयाचे. बाकी सर्वांशी मौन. तुझे मौन याही प्रकारात मोडत नाही. आणखी एक मौनाचा प्रकार आहे. तो म्हणजे एखाद्या माणसाखेरीज सगळ्या जगाशी अगदी अघळपघळ. बोलावयाचे. या जातीचे तुझे मौन दिसते. बच्चू [कै. केशव दादांचे सर्वात धाकटे चिरंजीव] असे मौन धारण करीत असत. त्यावेळी त्यांचा चेहरा किती तरी गोड दिसतो. लहान मुलांचे प्रेम जसे निर्व्याज असते तसाच त्यांचा रागही निष्कपट असतो. त्यांच्या रुसण्यातही मोहकता असते. मला आपल्या मुलीचे मौनही असेच वाटते. बच्चू आपल्या तोंडाचा फुगा करुन रुसला म्हणजे त्याच्यावर उलट रागावणे त्याच्या आईच्याच काय पण इतरांच्याही जीवावर येते. आम्ही उलट त्याचीच समजून घालतो. हे पत्र म्हणजे त्यातलाच एक प्रकार आहे.

तुम्हा मुलींचा काय नेम? तुमची जातच अशी. विजेला सगळे जग चपला म्हणून म्हणते. चंद्र सूर्याला म्हणते का कोणी? विष्णूला कोणीच चंचल म्हणत नाही, पण लक्ष्मीला चंचल म्हणत नाही असा कोण आहे? तेव्हा त्यात स्त्रिया अर्थात त्यातही मुली बालीश म्हटल्या की त्या अगदी स्पिरीट सारख्या चंचल असायच्या. पण तोच लक्ष्मीचा पिता समुद्र, त्याचा लौकीक अगदी उलट. तो कधीच आपली स्थिरता ढळू देत नाही. प्रक्षुब्ध झाला तरी मर्यादा सोडीत नाही.

तू आपल्या शीलाला अनुसरुनच वागतेस तेव्हा मलाही समुद्राच्या स्वभावाचे अनुवर्तन करणे भागच आहे. दोघेही आपापला धर्म पाळतो. कोणी कोणाला बोलू शकत नाही. उमेचा पिता हिमालय याने तर आपल्या डोक्यावर कायमचा बर्फ ठेवून घेतला आहे.

तुझी आई म्हणते, पोर शेवटी जातीवर गेली. कोणत्या मुलीने आई

बापांना जन्मभर साथ दिली आहे, तर तुमचीच देईल? असे म्हणून एक लांब उसासा टाकून एखाद्या तत्वज्ञान्याप्रमाणे विरक्त होऊन ती आपल्या चुलीची उपासना करण्यात मग्न होते.

तुझी मैत्रीण बबाताई, आपल्या स्वभावाप्रमाणे वागत आहे. आपली बबडी म्हणजे प्रयागची गंगा. स्वच्छ, पावित्र आणि पारदर्शक पण खळखळ वाहणारी. कधी या काठाशी तर कधी त्या काठाशी खेळणारी !

आता पुरे!

तुझा
दादा

अकोला
ता./१४/९/१९३६

*प्रिय मुलीस* अनेक उत्तम आशीर्वाद,

तुझे पत्र मला मिळाले त्यावेळी मला काय वाटले असेल याची कल्पना तू स्वतःवरुन कर, अनपेक्षित आनंदाची मजा काही औरच असते. ज्या वस्तूच्या प्राप्तीकरीता आपल्याला तीव्र उत्कंठा लागली असेल तीच वस्तू अगदी ध्यानीमनी नसता अभावितपणे प्राप्त झाल्यास जो आनंद होतो त्याच्यापुढे इतर सर्व आनंद फिके पडतात. पत्र पाहून आनंद झाला आणि वाचल्यानंतर तो दुणावला. हृदय भरुन आले. ज्या निष्पाप वृत्तीने तू वडील म्हणून माझ्यावर प्रेम करतेस त्या प्रेमाला पात्र होण्याचा मान ईश्वराने मला द्यावा अशी प्रार्थना अगदी स्वाभाविकपणे माझे हृदय करु लागते.

चि. बबीवरील माझे प्रेम पू. काकाजींच्या तुझ्यावरील प्रेमाप्रमाणेच अगदी स्वाभाविक आहे. ते केव्हा सुरु झाले, कसे सुरु झाले आणि का सुरु झाले हे सांगता येणे अशक्य आहे. पण जगात रक्तसंबंधाचे नाते एवढे एकच नाते असते असे थोडेच आहे? ज्यात शारीरिकतेचा किंवा वैषयिकतेचा मुळीच गंध नाही अशी ही काही नाती आपल्या सुदैवाने जगात अजून आहेत. दोन मित्रांचा स्नेहसंबंध हा असाच असतो. रक्त पाण्यापेक्षा घट्ट असेल पण स्नेहापेक्षा घट्ट नाही. इतक्या दिवसांच्या सवयीनंतर चि. बबी आणि तुझ्यामधले अंतर पार नाहीसे होऊन गेले आहे. इतके की त्याची मला कुणी मुद्दाम आठवण करुन दिल्याखेरीज भानही राहत नाही. देवाजवळ मागणे एवढेच आहे की, चि. बबीप्रमाणेच तुझ्या जीवनावर माझ्या जीवनाचा जो परिणाम व्हायचा असेल तर तो तुम्हाला हितकर, कल्याणप्रद आणि उन्नतीकर ठरो ! तुला मार्गदर्शन मुद्दाम करु लागले की त्याच्यातले सगळे स्वारस्य नाहिसे होते. मार्गदर्शन आपोआप घडले पाहिजे. आईच्या जीवनाचा स्वाभाविकरीतीने मुलांच्या जीवनावर जो नकळत परिणाम होतो तो सगळ्यात टिकाऊ असतो. तितका अधिकार माझ्या अंगी असता तर मला धन्यता वाटली असती. तरी पण संगतीचा परिणाम झाल्यावाचून राहात नाही. त्यात कोणी कुणाचे मागदर्शक नसते, पण हा परिणाम परस्परांना चित्तशुध्दिकारक ठरो असा प्रयत्न केला म्हणजे झाले. ज्या प्रेमात वैषायिकता

किंवा स्वार्थ अगर मतलब नसतो ते प्रेम माणसाला पावन करणारे आहे. शत्रुवर सुध्दा असे प्रेम करायला शिका हीच बापूंची शिकवण आहे.

तुला पत्र लिहायला बसलो तेव्हाच चि. गंपूचेही [धाकटा भाऊ] पत्र मिळाले. त्याच्या आणि तुझ्या पत्रातून एकच सूर निघतो अगदी जुळ्या भावांइतके साम्य आहे दोन्ही पत्रात ! मुली, भावंडाचे व मुलामुलींचे प्रेम हेच माझ्या जीवनाचे रसायन आहे. प्रेम हे शुध्द करणारे असल्यामुळे अग्नीप्रमाणे दाहकही असते. मोह व आसक्ती दोन्ही प्रेमामध्ये जळून खाक होतात. प्रेमामधील हिणकस भाग म्हणजे पार्थिव अंश. शारीरिकता ज्या मानाने कमी त्या मानाने प्रेम अधिक शुध्द. तरी आपण देहधारी प्राणी असल्यामुळे प्रेमात शारीरिक सान्निध्याची आकांक्षा थोडीफार राहणारच. आईला मूल जवळ घ्यावेसे वाटते, भावाला भावाची भेट व्हावी अशी इच्छा होते, पुष्कळ दिवस भेट न झाल्यास दूरचे स्नेहीसुध्दा भेटीसाठी उत्कंठीत होतात हा सर्व शारीरिक, पण पवित्र शारीरिक प्रेमाचा भाग होय. वासराला चाटणाऱ्या गाईच्या किंवा आपल्या चिमुकल्या छकुल्याचे पटापट मुके घेणाऱ्या आईच्या प्रेमाचेच हे सुधारलेले प्रकार आहेत. म्हणून मुले मुली जवळ असावीत ही इच्छा असणे स्वाभाविक आहे. पण खरे प्रेम कल्याणाच्या आड येत नाही. हाच प्रेम आणि मोह यात भेद आहे. म्हणून प्रेम वियोगाचे कर्तव्यही मोठ्या कळकळीने पार पाडते. प्रेमातील संयम वियोगाचे दारुण दुःख सहन करायला लावतो. पण त्याबरोबरच अंतःकरणातील हीन वृत्ती जाळून टाकतो, बाळ तू आपले सर्व लक्ष अभ्यासाकडे लाव. हाच पूर्व तयारीचा काळ आहे. याच वेळी केलेली कमाई पुढे जन्मभर पुरते. मनाला योग्य वळण लावण्याचे, बुध्दीचा विकास करण्याचे व शरीराला काटकपणाच्या सवयी लावण्याचे हेच दिवस आहेत. सेवेकरिता या तिन्हींची अत्यंत गरज आहे.

तुझा
दादा

वर्धा

ता. ७/१०/१९३६

*प्रिय मुलीस* अ. उत्तम आशीर्वाद

तू माझ्या उत्तराची वाट जितक्या आतुरतेने पहात असशील तितक्याच उत्सुकतेने मी तुला पत्र पाठविण्याच्या संधीची वाट पाहत होतो. मुली, तुला अंतर्ज्ञान असले पाहिजे एरव्ही तुला त्याच दिवशी मला पाठविण्याची स्फुर्ती झाली नसती. कारण की मी त्या दिवशी सकाळी परतलो होतो. गेल्या महिन्यात किती तरी हिंडलो म्हणून सांगू? कितीतरी ठिकाणी गेलो, व्याख्याने दिलीत, शेवटी अगदी वीट आला. तरी पण जीभेला सराव झाल्यामुळे ती एकदा सुरु झाली की वेळाचे भान राहात नसे. श्रोत्यांचे कान किटून जात असतील. पण मला काय त्याचे? मी त्यांचा पोट भरुन सूड घेत असे.

मुली किती दिवसांनी पत्र लिहिलेस? मी अगदी वाट पाहून थकून गेलो होतो, पण माणसाची आशा मात्र काही केल्या थकत नाही. आशेचा आनंद प्राप्तीच्या समाधानापेक्षा अनंत पटीने श्रेष्ठ आहे, असे म्हणतात. मला वाटते वेदांत्यांनी आनंदाला अनुकुल वेदना म्हटले त्याचे इंगित हेच असावे. आशेची वेदना श्रेष्ठ की प्राप्तीचे सुख श्रेष्ठ हे कोडे मला मात्र अजून उलगडत नाही एवढे खास.मला वाटते दोन्ही परस्परांपेक्षा सरस आहेत.

पू. काकाजींनी रत्नाकराच्या शेजारी उतरावे यात औचित्याचा भंग मुळीच नाही. खवळला तरी समुद्र आपली मर्यादा सोडत नाही म्हणतात. संयमाचा तोच अभ्यास काकाजींनीही केला आहे व त्यात त्यांना यशही बरेच मिळाले आहे. अनेक चळवळींचा योगक्षेम चालविणारे या अर्थाने ते रत्नाकरच आहेत, पण त्यांनी आपल्या सौजन्याने नररत्नेही काही कमी मिळवून ठेवली नाहीत. आता रत्ने साठवतांना काही माझ्यासारखे दगड यायचेच ! त्यांच्यामुळे रत्नांची कांती अधिक खुलून दिसते. समुद्राला वादळाच्या वेळी प्रक्षुब्ध होऊन व चंद्र प्रकाशाच्या उन्मादाने उचंबळून देखील आपली मर्यादा सांभाळता येते यातच त्याची थोरवी आहे. पू. काकाजींचे हृदयही असेच आहे, असा माझा अनुभव आहे. खामगावला सीतेची [एक मुलगी] भेट झाली. अगदी सुखात आहे. माझ्याशी मोठ्या आनंदाने व अर्थाची एफ़ जुनी ग्रीक म्हण आहे. जगामध्ये अशा निर्हेतुक प्रेमाचा अनुभव आल्यावर

ती म्हण खोटी आहे असे कोण म्हणेल?

सकिया व सादुल्ला येऊन गेलेत. सकिया पूर्वी इतकीच गोड व दिलदार आहे. ती आपल्या सासरी जायला अगदी अधीर झाली होती. तरी नमाने तिला आणखी अर्धा दिवस ठेवूनच घेतले आणि मला वाटते खान साहेबांच्या रुपाने तिचे अर्धे सासर जवळच असल्यामुळे तीही फारशी नाखूष झाली नसावी. कोठे त्या तुकारामाच्या वेळच्या कन्या सासुरासी जाये मागे परतोनी पाहे, अशा मुली आणि कोठे आजच्या या सासरी जायला उतावीळ झालेल्या तरुणी ! आनंदाने, उत्साहाने व आत्मीयतेच्या भावनेने सासरी जाणाऱ्या मुलीही या सुधारणेच्या युगातील बहुमोल सामाजिक देणगी आहे. ले हन्ट या इंग्रजी कवीबरोबर आपणही सकिया सारख्या तरुणींनं May her tribe increase असा मनःपूर्वक आशीर्वाद देऊ या !

लोक म्हणतात जग हे निष्ठुर आहे. बेदरकार आहे, निःसंग आहे. माझे अनुभव मात्र या उलट आहे. मला तर सर्व सृष्टीत ईश्वराची कृपा ओतप्रोत भरलेली दिसते. माझ्यासारख्या कुचकामाच्या, स्वार्थी व निर्हेतुक जीवनात आनंद मानणाऱ्या माणसालाही समाज जगवितो आणि त्याचे कौतुक करतो हे औदार्य ईश्वरी कृपेची साक्ष पटविण्यास पुरेसे नाही काय? कोण म्हणतो हे पृथ्वीला दुर्जनांचा भार होतो म्हणून? तसे झाले असते तर मला क्षणभर तरी जगता आले असते काय? जगामध्ये प्रत्येक पदार्थाच्या धारणेचे कारण त्याची परमाणूमधील स्नेहाकर्षण शक्ती आहे. या महान तत्वाचा साक्षात्कार गांधीला झाला आहे. म्हणून त्याला सर्वभूती हरि प्रत्यक्ष दिसतो. तो प्राणीमात्रांवर सारखे प्रेम करु शकतो. हे भाग्य प्रत्येकाला लाभत नाही. आपल्या साडेतीन हात देहाच्या व रक्तसंबंधाच्यागुळे स्वभावसिध्द स्वजनांच्या पलीकडे सजातीय व्यक्तींशी पवित्र प्रेमाचा संबंध जोडणे हीच आपली साधना ठरते. हाच तो विनोबांचा प्रेम–संग्रह. मित्रप्रेम मातृप्रेमापेक्षाही उदात्त असते असे मी म्हणतो ते याच अर्थाने. मित्रप्रेम स्वयंस्फूर्त असते म्हणूनच जास्त दिव्य असते. पण स्त्री–पुरुषांमधील प्रेम सामान्यतः विकारदुषीत असते, नसले तरी ते तसे होण्याची भीती असते. म्हणून रक्त संबंधामुळे स्त्री–पुरुष संबंधांना सुरक्षितता लाभली आहे. अशा माता–पुत्र, पिता–कन्या, भाऊ–बहिण संबंधांची भावना मित्रत्वाच्या ऐवजी करणे अत्यंत आवश्यक व हितावह आहे. हे एक मोठेच संरक्षक कवच आहे. ही भावना भारलेला ताईत आहे. गांधींच्या कल्पनेप्रमाणे स्त्री–पुरुषाचे सहजीवन तर वाढतच जाणार, पण पवित्र जीवनाला मात्र बाधा येता कामा नये. म्हणून दोघांनाही या

भावना करायला शिकले पाहिजे. एका वस्तूच्या ठिकाणी दुसरीच पाहण्याचा अभ्यास करणे याचे नाव भावना. रक्तसंबंध स्वाभाविक असते, तेथे भावनेची गरज नाही. प्रेमसंबंध जोडलेला असतो म्हणून भावना आवश्यक असते. तिने संबंध शुध्द व अकलुषित ठेवण्यास मदत होते. समाजातील स्त्री–पुरुषांच्या सहजीवनाचे हा संबंध प्रतीक आहे. हे सगळे तुला समजायला कठीण वाटेल, पण पुन्हा पुन्हा विचार करुन वाचशील तर सहज कळेल. प्रत्येक सार्वजनिक सेवकाला हे केव्हातरी कळायला पाहिजे.

तुझा

दादा

वर्धा

ता. २३/११/१९३६

*प्रिय मुली,*

मी आपणहून तुला पत्र पाठविणे म्हणजे एक प्रकारे प्रतिज्ञा भंगच आहे. पण काही प्रसंगी प्रतिज्ञा भंगाने मनुष्याचा अहंकार नाहीसा होऊन त्याचे जीवन जास्त शुध्द होते. त्यात माझा तर पक्ष नेहमीच उणा आहे. प्रतिज्ञा पालनाचा ताठा मला कशाला हवा? काही प्रसंगी हार खाण्यात देखील आनंद असतो. हृदय धर्माचा विकास असतो. माझा प्रतिज्ञाभंग माझ्या हृदयाच्या तळमळीची साक्ष देईल म्हणून मला तो प्रिय वाटतो. येथे असतांना तू म्हणत होतीस की, आले नाही की, येऊ शकले नाही म्हणून समजा. तेच सूत्र सद्यः स्थितीला लागू करुन लिहिले नाही, म्हणजे लिहू शकले नाही असे समजा. असे मानून मी बापडा मनाचे कसेबसे समाधान करुन घेत असतो. पुन्हा, तुझ्याऐवजी तुझी गोड आठवण अखंड माझ्याबरोबर असतेच. तुझ्या आठवणीचे अविच्छिन्न सान्निध्य काहीसे दुःखमय असते खरे. पण त्या दुःखाचीही लज्जत काही औरच असते. जगातील अत्यंत गोड दुःखापैकी आठवणीचे दुःख हे एक आहे. जीवनाला त्याने एक प्रकारची अदीट रुची येते. माझी अत्यंत आवडती भाजी म्हणजे कारल्याची भाजी! थोड्याशा कडुपणामुळे ती भाजी जास्तच रुचकर लागते. आठवणीचे सुख हे कारल्याच्या भाजीसारखे चवदार असते. तुझी आठवण यायला काही कारण किंवा प्रसंग लागत नाही. ती आपली उगीचच येत राहते.

तुझे शिक्षण अजूनही प्रयोगावस्थेतच आहे असे दिसते. तू तर काहीच न लिहिण्याचे ठरविलेले दिसते. जीवन देखील एक मोठा विशाल व गंभीर व पवित्र प्रयोगच आहे. पण प्रयोग हा भरमसाठ नसावा. त्याचेही एक तंत्र, शास्त्र आणि ठराविक पध्दती असते. पण हे सर्व तुला कळत नाही असे थोडेच आहे. पण मनच हे असे ! आपले म्हणजे कारणावाचूनही, बोलण्यावाचून राहवत नाही. बाळ, संबंध आयुष्याकरिता चारित्र्याचे, शारीरिक शक्तीचे, मानसिक पावित्र्याचे आणि बौध्दिक ज्ञानाचे भांडवल मिळविण्याची व साठविण्याची हीच वेळ आहे. सहज खेळता खेळता लीलेने जीवनव्यापी व ब्रह्मांडव्यापी प्रेमाचा संग्रह याच वेळी होऊ शकतो. कारण अजून जीवन विषयाने व विकाराने कलुषित आणि संकुचित झालेले नसते. आपली बबी

एक मोठी गोड कविता म्हणत असते.

बाळे हास, हास, हास
हीच वेळ हासायची
सौख्य सुधा सेवायची
जोवरी न जाणिले तु या
मतलबी जगा !

जग ही एक मोठी थोरली बाजारपेठ आहे. मतलब, फायदा आणि स्वार्थ ही त्या पेठेतील महत्वाची तत्वे आहेत. सौदा हे नियामकतत्व आहे. लहानपणी मुलांच्या पवित्र मनात या वस्तूंचा पापमय स्पर्श झालेला नसतो. म्हणूनच जीवनाचा खऱ्या शुध्द व स्वच्छ जीवनाचा आस्वाद त्याचवेळी घेता येतो. माझ्या पोरी, हीच वेळ हासायची आणि हासत हासत शिकायचीही पण आहे. हे विसरु नकोस. तुझ्या अभ्यासात मातृसेवेत व खेळण्यात बागडण्यात व्यत्यय येऊ नये म्हणून पत्र फार लांबू देत नाही. चि. नमा सध्या वाळवंटातील जिवंत झऱ्यासारखी आहे. तिचा जिवंतपणा जिवाला चटका लाऊन मुंबईस जाणार आहे. मात्र दादाचे जीवन म्हणजे सुंदर सुंदर भग्नावशेषांनी भरलेले ओसाट नगर होणार. पू. काकाजींच्या नाव लौकिकाला शोभण्यासारखे काही तरी तुझ्या हातून घडो ! ईश्वर तुझे जीवन सुखमय, पराक्रमपूर्ण करो !

तुझा
दादा

वर्धा
ता. ७/१२/१९३६

*प्रिय मुली,*

तुमच्या आईने काही चांगला जिन्नस तयार केला की मला हटकून तुझी व तुझ्या मैत्रिणीची आठवण येते. अगदी नुकतेच जेवण झालेले असले तरी देखील मी दिल्यावर तुम्ही मिटक्या मारुन खात आणि मला आनंदाच्या उकळ्या फुटत. काही पाहिले, काही खाल्ले किंवा काही अनुभवले तर त्यावेळी तू असतीस तर असे वाटल्यावाचून राहवत नाही. आनंदाला वाटेकरी मिळाला म्हणजे तो दुणावतो, दुःखाला वाटेकरी मिळाला म्हणजे ते कमी होते.

तुला मी काय पाठवू? माझ्याजवळ आहेच काय? माझा जीव तेवढा आहे. तोही अगदी माती मोलाचा आहे. जगाला काय किंवा स्वकीयांना काय त्याचा काडीचाही उपयोग नाही. जिवापेक्षाही एक मोलाची वस्तू आहे, ते म्हणजे प्रेम. पण त्याची ज्याला किंमत असेल त्याला ! इतरांना त्याचे काय. होय, त्यात पुन्हा देण्यासारखे काय आहे, ते मुकाट्याने करावयाचेच असते ते पित्याने दिले तरी मुलीला त्याची जाणीव होईलच असे नाही.

तुझा
दादा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध 3713
दा. क्र. 26649
ठाणे

धुळे,
१७/१/१९३७

*प्रिय मुलीस,*

मी पुण्याला आलो म्हणजे मुंबईला आलोच आणि असे असूनही माझ्या मुलीची भेट नाही ही गोष्ट मनाला टोचत होती. तुलाही वाटत असेल की, हा पुण्याला आल्यावर मुंबईला आल्यावाचून राहणार नाही, पण अशक्यही शक्य करुन दाखविले की नाही? पोरी, तुझ्या दुबळ्या मनाच्या दादालाही थोडासा संयम साधतोच की नाही? पुण्याला आल्यावरही मुंबईला न येण्यात मला जो संयम करावा लागला त्याची तुला काय कल्पना? एखाद्या दिवसासाठी मुंबईला येऊन जाणे माझ्या मनाला रुचेना. तुरुंगात घरच्या मंडळींची भेट घाईघाईने घेतल्यावर मन किती अस्वस्थ होत असे याचा अनुभव मला आहे. म्हणून तशी भेट आपल्या मुलीची घ्यावी असे वाटेना. जास्त दिवसांची सवड तर नव्हती म्हणून मन घट्ट करुन पुणे सोडले. पत्राने अर्धी भेट होतेच म्हणतात.

तू, मदू [मदाळसाबेन नारायण] बबी [सौ. उषाताई तामस्कर] यांचे विकाररहित प्रेम मनाला मोठाच आनंद देते. चि. बबी आपल्याच मनाशी मोठ्याने

बाळे, हास, हास हास,
हीच वेळ हासायाची
सौख्य सुधा सेवायाची
जोवरि न जाणिले तू
मतलबी जगास !

गाऊ लागली म्हणजे त्या ओळीत तिच्या व तुम्हा तिघांच्या शुध्द मनाचे प्रतिबिंब उमटल्याचा भास मला होतो. या अर्थवादी परमार्थवादी आणि व्यर्थवादी जगात जोपर्यंत तुम्ही त्याचा गढुळपणा जाणला नाही, तोपर्यंतच खरा आनंद आहे. जोवरी विकार नसती कोवळ्या मनात बाळे,– मनाला विकाराचा स्पर्श झाला नाही म्हणूनच तुमचे माझ्या मुलींचे सात्विक प्रेम माझ्या मलीन मनालाही शुध्द करु शकते. या प्रेमाला त्रिभुवनात मोल नाही.

तुम्ही मुलींनी आपल्या जीवनात काही तरी नाव घेण्यासारखे करुन

दाखवावे असे मला फार वाटते हे तुला माहितच आहे. मुलांची अभिरुची त्यांच्या धंद्याच्या निवडीवरुन जशी दिसून येते तशीच मुलींची लग्नावरून दिसून येते असे मला वाटते. तुमच्या हातून काही नाव घेण्याजोगे जर या बाबतीत घडले तर मला मूठभर मांस येईल. नाहीतर जगात मग नेहमीसारखे सगळे घडतेच आहे.

सौ. सफिया भेटते का कधी? तिला काही आता मोकळे आकाश राहिले नाही. पिंजऱ्यात आहे बिचारी ! की तो तिच्या पिंजऱ्यात आहे बिचारा, देव जाणे !

पू. माताजींना प्रणाम. मी तेथे त्रास द्यायला आलो नाही यामुळे त्यांनी माझे आभार मानले पाहिजेत.

**ता. क.** संगमनेरला सतत साडेपाच तास पू. काकाजींनी [कै. जमनालाल बजाज] तेथील मंडळींशी जो युक्तीवाद केला तो पाहून थक्कच झालो. ता. २ ला रात्री पूनमचंद राका यांच्या येथील त्यांची वृत्ती व वागणूक आणि संगमनेर येथील वागणूक पाहून त्यांच्याबद्दलचे माझे प्रेम व आदर दसपट वाढला. त्यांची विचारसरणी निर्दोष आहे. बुध्दिवादात त्यांचा हातखंडा आहे. बिनतोड कोटिक्रम, सूक्ष्म भेद पुढे मांडण्याची त्यांची हातोटी मोठी मार्मिक आहे. मला तरी हा माणूस फार मोठ्या योग्यतेचा वाटतो. हे मी पू. काकाजींच्या मुलीला लिहित नाही, माझ्या मुलीला लिहित आहे. या माणसाच्या ठिकाणी समंजसपणा व दिलदारपणा औदार्य व शहाणपणा, तत्वनिष्ठा व समयज्ञता, सौजन्य व करारीपणा, हिशेबीपणा व त्यागवृत्ती यांचा मोठा व मधूर संगम झालेला आहे. म्हणूनच माझ्यासारखा तल्लख वृत्तीचा माणूसही त्यांच्या संग्रही राहू शकतो. मुली, पूर्व पुण्याईने अशा थोर मनाच्या व थोर शीलाच्या माणसाच्या पोटी तुझा जन्म झाला आहे. त्याच्या नावाला साजेलसे काही करुन दाखव. माझ्या आनंदाला व अभिमानाला सीमा राहणार नाही. हृदय उचंबळून आले म्हणून हे उद्‌गार सहजगत्या बाहेर पडले.

तुझा
दादा

हिंदी प्रचार समिती, त्यागराज
नगरम् मद्रास
ता. १८/३/१९३७

*प्रिय मुलीस* अनेक उत्तम आ.

वर्ध्याला असताना जिन्यावर बच्चूची पाऊले वाजू लागली की मला माझ्या मुलीची हटकून आठवण येतेच. तुमच्या आईला तर पदोपदी येते. पण वर्ध्याला मन आवरणे साधते, प्रवासात ते शक्य होत नाही.

ती पहा बबाराणी पुढे गाऊ लागली आहे.

संसृतिचा पंजर तुजला.
अजूनी नाही कोंडायाला
तोवरी तुला फिराया
मोकळे आकाश ! बाळे हास, हास, हास, हास !

बबी काही मोठी गाणारी नाही. नुसतीच साधे गाणे म्हणते. पण तिच्या आवाजाची आठवण झाली तरी हृदय भरुन येते. जुहूवर समुद्राच्या काठी आकाशाखाली एका झोपडीत राहणाऱ्या माझ्या मुलीची आठवण झाल्याखेरीज राहत नाही.

तुझ्याविषयी तर पू. काकाजींनी मला सर्व काही सांगितलेच आहे. आता पुरे!

तुझा
दादा

तामिया

ता. १/६/१९३७

*प्रिय मुलीस* अनेक उत्तम आ.

मी आज सकाळी येथे पोहचलो. हे ठिकाण पंचमढी–छिंदवाडा रस्त्यावर छिंदवाड्याहून ३५ मैलावर व पंचमढीपासून ५० मैलावर आहे. बरेच रमणीय व थंड ठिकाण आहे. सध्या येथे माझ्याबरोबर घरचीच व नातलग अशी आठ दहा मंडळी आहेत. सभोवर सुंदर व रमणीय टेकड्या आहेत. दोन्ही वेळ मनमुराद फिरतो व दोन्ही सांजा चापून पुख्खा मारतो. हा कार्यक्रम अव्याहत चालू आहे. मग मला मुलींची आठवण कशी बरे येणार नाही? तामियाला आम्ही इतकी गर्दी केली की, गावातल्या विहिरीचे पाणी देखील पुरेना ! गावाजवळच एक सुंदर विहिर आहे. पाणी अगदी बर्फासारखे थंडगार व विलक्षण गोड आहे. विहिरीच्या शेजारी बांबूच्या चिपाडाचे व्यवस्थित कंपाऊंड, त्यात आंब्याची वाटोळी सुबक झाडे व पेरुची दाट झाडे आहेत. आंब्याच्या झाडाच्या सावलीत एक टुमदार व स्वच्छ झोपडी आहे. ती पाहून मदूची [मदालसा अगरवाल] आठवण होतेच. या प्रवासात माझे कपडे धुणे, मला पाणी काढून देणे, माझ्या वस्तू जेथल्या तेथे ठेवणे इ. कामे गंपूकाका किंवा अच्च्युकाका करतो. त्यावेळी दक्षिणेत दादाची आई झालेली मदू कितीही श्रम झालेले असो, ४०/५० बादल्या पाणी उपसण्यास तयार !

येथून सुमारे तीन मैलावर एका बऱ्याच उंच टेकडीवर एक मिशनरी लोकांचा गोड बंगला आहे. त्या बंगल्याची उंची पंचमढीइतकी आहे. दोन मिशनरी बाया तेथे राहतात. आपल्या इकडील बायकांना असे जंगलात राहू दिले तर! लोकांच्या जिभेला हाड उरणार नाही. रात्री त्या बंगल्यात गॅसचा दिवा लागला म्हणजे लांबून दिसतो. एखाद्या ताऱ्यासारखा! डाक बंगल्यापेक्षा सुंदर आहे बराच. तने सुहावे है के? तुला आवडत असेल तर तू हा घे, डाक बंगला आपण सफियाला देऊन टाकू व बबाराणीला मदूच्या झोपडीजवळ असलेला दुसरा एक बंगला देऊन टाकू कबूल ! बोल !

काल एका खोल व रमणीय खोऱ्यात हळूहळू वहात असलेल्या डोंगरी झऱ्याजवळ डोंगराच्या कपारीत असलेल्या महादेवाच्या दर्शनाला गेलो होतो. डोंगरात सारखे उतरत जावे लागते. व झराही सारखा ठुमकत ठुमकत उतरतो. मधून मधून धबधबे आहेत, तेथे देऊळ नाही पण शिवलिंग आहे.

त्याला आपोआप अभिषेक होतो. मीही मौनानेच शिवस्तुती केली. कोणत्याही टेकडीवर गेले की जिकडे तिकडे डोंगराच्या रांगाच रांगा दिसतात. सूर्यास्तापूर्वीचा व त्यावेळचा देखावा बहारीचा होता. डोंगराची लांब शिखरे मोठीच मनोहर दिसत होती. तुम्हा मुलींना फारच आनंद झाला असता, आता तुमची आठवण करुन समाधान मानणेच भाग आहे.

आज सकाळी दोन मैलावर असलेल्या एका उंच शिखरावर चढलो. रस्ता अरुंदशी पायवाट ! काही ठिकाणी वानरांप्रमाणे हाताचा व पायाचा उपयोग करुन चढावे लागले. डोंगराच्या त्या सुळक्यावरुन भोवतालचे दृश्य फारच रमणीय दिसते. खाली तर पहावतच नाही. अगदी भोवळ येते.

आजची वाट तर अवघड व आम्ही तर उन्हात निघालो. परत येताना पळसाची पाने आणली व त्याच्या पत्रावळी व द्रोण केले. त्या पत्रावळी रुप्याच्या ताटांपेक्षा स्वच्छ व सुंदर दिसतात.

बैतुलला लग्नात सामाजिक प्रश्न या विषयावर व्याख्यान झाले. कडाडून तब्बल दोन तास बोललो. तरुण–तरुणींच्या विचारांना बराच जोराचा धक्का बसला. त्यांची हृदये थरारुन गेली. मी विवाहाच्या प्रश्नाचाच विचार प्रामुख्याने मांडला.

हल्लीच्या या कमकुवत श्रध्देच्या युगात समाजवादी फॅसिस्ट गांधीवाले हेच काय ते निष्ठावान आहेत. या गोष्टीचा उल्लेख केला. समाजवादाच्या या भयंकर आक्रमणाच्या काळात विवाहाचे पावित्र्य व कुटुंबसंस्था यांचे रक्षण करावयाचे असल्यास गृहजीवनाचा पाया स्त्री स्वातंत्र्य असला पाहिजे आणि संयमावाचून वास्तविक स्वातंत्र्य शक्य नाही. हा विवेचनाचा मुख्य मुद्दा होता. वैवाहिक सुख टिकाऊ होण्यासाठी वैवाहिक जीवनाचे अधिष्ठान, बाह्य आकर्षण, पैसा सत्ता, रुप यापैकी काहीही नसावे तर समानवृत्ती व समान ध्येय आणि शक्य तर समान संस्कार असावेत या मुद्याचेही विवेचन केले.

तुझा
दादा

बजाजवाडी,
वर्धा
ता. ५/७/१९४०

*प्रिय मुलीस* अनेक उत्तम आशिर्वाद

तुझे लग्न ठरले असे ज्या दिवशी समजले त्याच दिवशी तुला आशीर्वाद पत्र लिहावे असे मनाशी ठरविले. यात जे काही मी लिहिणार आहे त्यात नवीन काहीच नाही, परंतु या मंगल प्रसंगी त्याचीच पुनरावृत्ती करीत आहे.

हल्ली समाजातील तरुण तरुणींच्या जीवनात गांभीर्य मुळीच राहिले़ले नाही. कोणाला जीवन ही रंगभूमी वाटते तर कोणाला ते क्रीडांगण वाटते आणि बहुतेकांना तर तो फक्त रंगमहाल वाटतो. तरुण/तरुणी जीवनातील अनेक आवश्यक गोष्टी करावयाच्या म्हणून करुन टाकतात. त्याप्रमाणे लग्नही करावयाचे म्हणून करुन टाकतात. जेव्हा बालविवाह होत असत त्या काळात लग्न हा एक खेळ वाटत असे आणि हल्लीच्या नास्तिकपणाच्या युगात विलासाच्या अनेक प्रयोगापैकी तोही एक प्रयोग वाटतो.



एवंम, जुन्या काय किंवा नव्या काय कोणत्याही पिढीला त्याचे वास्तविक गांभीर्य लक्षात घेण्याची गरज वाटत नाही. पण मनुष्याच्या जीवन विकासाच्या दृष्टीने हे अत्यंत भयावह आहे.

जीवनातील इतर सर्व प्रसंगांपेक्षा लग्न हा जास्त गंभीर आणि महत्वाचा प्रसंग आहे. तो जन्म व मृत्युपेक्षाही अधिक गंभीर आहे. कारण जन्म–मृत्यू आपल्या हातचा नाही, पण विवाह आपण करीत असतो. म्हणून तो अर्धवट मनाने कसेबसे पार पाडणे हा गुन्हा आहे. दोन व्यक्ती व दोन जीवनांच्या एकीकरणाचा तो प्रसंग आहे. स्त्रियांच्या दृष्टीने तर पुनर्जन्माचा प्रसंग आहे. पुरुषांच्या दृष्टीनेही नवीन आश्रमाची दीक्षा घेण्याचा गंभीर प्रसंग आहे, जीवन परिवर्तनाचा प्रसंग आहे.

स्त्रिच्या दृष्टीने या प्रसंगाचे महत्व व गांभीर्य अमर्याद आहे. ती आपले जीवन आपल्या पतीच्या जीवनाशी फक्त जोडूनच थांबत नाही, आपले जीवन त्याच्या जीवनात ओतून ती स्वतःला विसरुन जाते. आपण सुताने दोन तार सांधतो तसे हे नाही. पाण्यात मिठाचा खडा जसा विरघळून जातो तसे हे आहे. स्त्रीचे जीवन प्रेममय असावे, ती आपले सर्वस्व आपल्या पतीला अर्पण

करुन स्वतःचे अस्तित्वही विसरुन जाते. नावाकरिता पुरुष आपला जीव देखील देतो. नाव मिळविणे व नाव राखणे यातच त्याचा पुरुषार्थ मानला जातो. स्त्री आपले स्वतःचे व आपल्या बापाच्या घराण्याचे नाव देखील सोडून देते. मागे स्वतंत्र जीवनाची आठवण देखील राहू नये म्हणून माहेरचे व स्तःचे नाव सुध्दा बदलून टाकते. पतीशी तादात्म्य व्हावे म्हणून हा एवढा प्रचंड त्याग ती सहन करते.

यात स्त्री स्वभावाची थोरवी आहे. हे फक्त शरीराचे दान नव्हे. शरीराचे दान तर गुलामही करतो. शिपाई व परोपकारी महात्मेही शरीराचे दान करतात. हरिश्चंद्राने स्वतःला व तारामतीला विकले. हे शरीराचे पवित्र दास्य झाले. शिबीराजाने एका कबुतराचे प्राण वाचविण्यासाठी आपले शरीर दिले. दधीचीने समाज कार्याकरिता दिले हे शरीराचे दान झाले. पतीची लाज राखण्याकरिता एका साध्वीने आपल्या अब्रुचेही दान केल्याची कथा आहे. पण शरीर अर्पण करणे म्हणजे लग्न नव्हे. लग्नात आत्मदानही करावयाचे असते. हृदयदान म्हणजे आत्मनिवेदन याचेच नाव आत्मसमर्पण. जेथे हृदय समर्पणाचा मुद्दा आहे तेथे ते मनःपूर्वक केले पाहिजे हे काय निराळे सांगायला पाहिजे. यालाच सर्वस्व वाहून देणे म्हणतात. व हेच लग्न होय !



याप्रमाणे सर्वस्व अर्पण करुन निर्भय होऊन जाण्याची शक्ती ईश्वराने स्त्री हृदयालाच दिलेली आहे. म्हणूनच म्हणतात की, जीवन प्रेममय असते. तिच्या दृष्टीने प्रेम व कर्तव्य एकरुपच असतात. म्हणून पतीच्या जीवनाशी समरस होण्याकरीता ती आपले स्वत्व देखील सोडून देते आणि पतीचे जीवन संपले म्हणजे आपलेही जीवन संपले असे मानते. हा आत्मोत्सर्ग स्त्रीच करु जाणे !

गंगा यमुनेच्या संगमाला त्रिवेणी म्हणतात. दोन समान अधिकाराच्या व्यक्तींची जीवने एकत्र गुंफायला एक तिसरेही तत्व लागते. म्हणून तेथे सरस्वतीची कल्पना करावी लागते. वेणीचे दोन पदर एकत्र गुंफायला आघोळ लागतोच, पण पती पत्नीच्या पवित्र प्रेम मिलनाला तिसरा कोण खपत नाही. स्त्रीच्या दृष्टीने लग्न म्हणजे दोन जीवनांची एकत्र गुंफलेली वेणी नव्हे. तिच्या दृष्टीने एका भांड्यातले पाणी दुसऱ्या भांड्यात ओतून रिते भांडे विसरुन जाणे, हा लग्नाचा अर्थ आहे. माणसाला सर्व काही देता येते पण आपले स्वातंत्र्य किंवा व्यक्तित्व देणे जीवावर येते. स्त्री हे देखील अर्पण करुन मोकळी होते.

पण स्त्रिची महती येथे संपत नाही. आपल्या पतीच्या जीवनाशी

एकरुप एकरस होऊन ती कृतकृत्य होत नाही, ती आपल्या पतीचे जीवन मलीन होऊ देत नाही. अस्तर ज्या प्रमाणे कापडाचे संरक्षण करते तशी ती आपल्या पतीला सांभाळते. बाहेर तर दिसत नाही आणि रक्षण तर सतत करीत असते. स्त्री जीवनाचा महिमा किती गाऊ मला त्याचा अनुभव आहे तोच कित्ता तू गिरवावास व आपल्या पतीचे जीवन धन्य करावेसे असा माझा तुला उपदेश आहे. तू आपल्या प्रिय पतीला आपली सर्व शक्ती, सर्व प्रेम आणि सर्व वैभव अर्पण करुन त्याच्या जीवनाचे माधुर्य वाढव. लग्न झाल्यानंतर त्याची पुरुषार्थ करण्याची शक्ती दुप्पट वाढली पाहिजे. जीवनात त्याला दुप्पट गोडी वाटली पाहिजे. बायको ही पायातली बेडी किंवा अडविणारा ब्रेक नसून इंजिनातील पेट्रोल आहे. ती स्वतः जळून जीवनाची गती कायम ठेविते असा त्याला अनुभव आला पाहिजे. तुझ्या पतीला आपल्याला एका जीवाचे ओझे वाहून न्यावे लागत आहे, असे वाटण्याऐवजी एकसे दो भले, एक सोबती लाभला असे वाटले पाहिजे. म्हणून मला शेषशायी भगवानाच्या पायाशी बसलेल्या लक्ष्मीच्या किंवा पार्वती अगर सीतेला वामांकी घेऊन बसलेल्या शिव किंवा रामाच्या चित्रापेक्षा अर्धनारी नटेश्वराचे चित्र अधिक सरस वाटते.

केवळ शरीरसंबंध जोडणे ही अनीती आहे. त्यात प्रतारणा आहे, लबाडी आहे. त्यात आपल्या सोबत्याचा अपमान आहे आणि आपला अधःपात आहे. ईश्वराचा त्यात उपमर्द आहे आणि माणसावर जुलुम आहे.

म्हणून या गंभीर प्रसंगी व मंगलसमयी तू आपले संपूर्ण हृदय आणि पंचप्राण एकवटून आपल्या प्रिय पतीच्या जीवनात ओतून दे. तुमचे संयुक्त जीवन फक्त सहजीवनच नव्हे अखंड, पवित्र तेजस्वी एकरुप होवो ! श्रुतींचा असाच आशीर्वाद संत गुरुजन व वडील माणसे तुला देतील. त्यांच्या वाणीत चारित्र्याचे सामर्थ्य असते, त्यांच्यात पवित्र शब्दात म्हणतो तुमच्या आकांक्षा, तुमच्या प्रकृती आणि तुमच्या आवडी एकरुप होवोत !

समानीव आकृती समानि हृदयनिवः !
समानस्तु वो मनो यथा वः सुसहासति

तुमचे दोघांचे संकल्प समान असोत, तुमची हृदये एकजीव होवोत. तुमची मने अभिन्न असोत म्हणजेच तुमचे जीवन सुखमय होवो.

तू वडिलासमान मानलेला
दादा धर्माधिकारी

*प्रिय मुलींनो,*

तुम्ही आपले शरीर फक्त कार्यक्षमच नव्हे तर कष्टक्षम बनविले पाहिजे. मुलींची शरीरे तकलुपी, नाजूक व लुसलुशीत असता कामा नये. विलासी लोकांनी आपल्या कामना तृप्तीकरिता तशा प्रकारच्या विलास चतुर ललनांची स्तुती केली असेल. पण ज्या बापाला आपली मुलगी मुलांइतकीच स्वसंरक्षणक्षम व पराक्रमी निपजावी असे वाटत असेल. त्याची इच्छा निराळीच असणार ! शरीरातून रोगाचा समूळ नायनाट झाल्यानंतर व्यायाम, आसने, घोड्यावर रपेट, धावणे इ. शारीरिक बलविकासाची साधने जरुर करावीत. चेहऱ्यावर आरोग्याची व शक्तीची टवटवी दिसू लागली पाहिजे. चर्येवर करारीपणा, शीलाची व विनयाची शालिनता आणि सौंदर्य यांच्यात मुळीच विरोध नाही. शेक्सपीयरच्या Measure for Measure मधील एक वाक्य आठवते. The hand that made you fair, has made you good. ज्या इसाबेलाबद्दल हे वाक्य फकिराने उच्चारले त्या इसाबेलाजवळ जेव्हा त्या राज्याच्या सिंहासनारुढ पुरुषाने आपली पापवासना बोलून दाखवली तेव्हा तिने बाणेदारपणे उत्तर दिले.–

"To see I under sentence of death, The impression of keen whips I would bear as rubies, and go to my death as to a bed that Longing I had seen sick for, ere I would yield myself to this shame,"

चारित्र्याच्या पोटी जन्मणारा हा बाणेदारपणा आणि देखणेपणा काटक व बलिष्ट शरीर हे गुण मुलांप्रमाणेच मुलीलाही भूषणभूत आहेत. मुलांचे शील हे परम् भूषणम् असेल. पण मुलींचे तर ते जीवन आहे. स्वतःच्या बाबतीत पापाचा तिटकारा पण दुसऱ्याच्या बाबतीत सहानुभूती व औदार्य ही शीलाची विशिष्ट लक्षणे आहेत. बेटा सामान्य प्रमादशील व अपराधी माणसातही अपार सौजन्य दडलेले असते. अव्यक्त साधुत्व असते म्हणून जो भौतिक किंवा अध्यात्मिक दृष्टीने अधिकारी बनला असेल त्याचे सर्वात मोठे भूषण दया हे आहे.

"Believe me, my lord, no ceremony that to great once belongs, not the king's crown nor the deputed sword, the marshal's tranch, nor the judge's role, becomes them with one half so good a grace as mercy does."

वरील धीरोदात्त भाषण ज्या इसाबेलाने केले तिच्याच तोंडी शेक्सपीयरने हे शब्द घातले आहेत. याचे कारणही तिने मोठ्या असंदिग्ध शब्दात सांगितले आहे.

"Go to your own bosom, My Lord, knock there and ask your heart." अपराध्याला शासन करण्यापूर्वी अंतःकरणाचा ठाव घ्यावा, आपले चित्त तपासावे. मी संस्कृती याच मनोवृत्तीला म्हणतो, स्वतःकरीता न्याय आणि इतरांकरिता क्षमेची प्रार्थना हाच संस्कृतीचा गाभा आहे. मुली, जगातील सामान्य दोषयुक्त स्खलनशील माणसे शीलवान व्यक्तींना वचकतात ती स्वतः पाप करतील, पण चारित्यवानाला पापप्रवृत्त करायला कचरतील. चारित्यवान व्यक्तींना पापाकडे प्रवृत्त करायला अनेकदा चारित्याचे सोंग करणारी माणसेच मायावी रुपे घेवून येतात. दांभिक, धर्मवादी, पुष्पितावाणीने भुरळ पाडणारे तत्वज्ञान सांगणारी माणसेच बहुधा सत्प्रवृत्त माणसाला पापात्मक धर्माकडे वळवितात.

शेक्सपियर काही साधू नव्हता. एक चारित्य दोषयुक्त नाटककार. त्याने काही धर्मग्रंथ लिहायला घेतला नव्हता. पण धर्मग्रंथात भिन्न धर्मियांविषयीची जी तिरस्काराची व द्वेषाची भावना आहे, ती या ग्रंथात नाही. तो पापाबद्दल तिटकारा उत्तम करतो, पण पापी माणसांविषयी कित्येकदा मोठ्या हळुवार व उदात्त भावना निर्माण करतो. आपल्या पापी नवऱ्याकरिता क्षमा याचना करणारी प्रेमविव्हळ स्त्री म्हणते,

"They say best men are moulded out of faults and for the most part become much letter for being a little bad. "

वाल्याचाच वाल्मिकी होतो ना? फक्त मनःपूर्वकता व प्रांजळता पाहिजे. वाल्याने पापेही मनःपूर्वक व उघडउघड केली. चोरुन पाप केले नाही म्हणूनच वाल्मिकी झाला.

पोरी, दुनिया अशाच लोकांची आहे. अजिबात सपशेल, सर्वस्वी दुष्टांची ती नाही. दुनियेत माणसावर प्रेम करायला संकल्प करुन वागायची

इच्छा करावी. त्यात पडेल ते सोसण्याची तयारी ठेवावी. मनात शंका, किंतु, परंतु, वानवा यांना थारा देऊ नये. जे पटेल, प्रशस्त वाटेल ते मनःपूर्वक करावे.

" Our doubts are traitors and make as lose the good we might often win by fearing to attempt it. " अशाच वेळी गीतेची आठवण येते. संशयात्मा विनश्यति असंदिग्धता आणि उत्कटता या दोन गुणांनी विचारात जीव ओतला जातो. असंदिग्धता हा बुध्दीचा गुण आहे आणि उत्कटता हा हृदयाचा गुण आहे.

सामाजिक जीवनाकरिता ज्या व्यावहारिक तत्वज्ञानाचा उपयोग होण्यासारखा आहे त्याची कल्पना तुला या मजकूरावरुन येऊ शकेल. बेटा, सारे काही कर पण वैतागाच्या कल्पनेला थारा मात्र देऊ नकोस. मृत्यूची भीती पार नाहिशी होणे यासारखे जीवनात दुसरे सुख नाही. मरणाचे भय गेले म्हणजे जीवन निर्विघ्न आणि अप्रतिरुध्द होते. बेटा जीवनावर प्रेतकळा येऊ देता कामा नये, मरणाची सावली पडू देता कामा नये. मरणाचे सारखे भयच वाटत राहिले तर जीव नकोसा होतो. म्हणून मृत्यूचे भय जिंकणे, म्हणजे मृत्यूंजय होणे जरुरी आहे. [१२–१२–१९४९]

‘The hand that made you fair, has made you good

" To see I under sentence of death, the impression of keen whips, I would bear as rubies, and go to my death as to a bed that longing I had been sick for, ere I would yield myself to this shame. "

" Believe me, my Lord, no Ceremony that to great Ones belongs, not the king’s crown, nor the deputed sword, the marshal’s tranch, nor the judge’s role, becomes them with one half so good a grace as mercy does. "

" go to your own bosom my Lord, knock there and ask your heart. "

" The cunning enemy of mankind, to catch a saint, with saints, does bait the hook. "

" They say best men are moulded out of faults, and for the most part become much the better for being a little bad. "

" Our doubts are trailors and make us lose the good we might often win, by fearing to attempt it. "

*प्रिय मुलींनो,*

आज आपण संक्रमण काळात आहोत. जुनी मूल्ये, जुन्या प्रतिष्ठा गडबडून ढासळत आहेत. नवीन मूल्यांची व नव्या प्रतिष्ठांची स्थापना करावयाची आहे. जडयंत्रवादी व प्रतिवर्तनवादी (Behaviourist) यांनी माणसाला यंत्राधीन व बाह्यतंत्राधीन कल्पिले होते. या यांत्रिक मनूतून आपण एका नव्या युगात प्रवेश करीत आहोत. या मूल्य परिवर्तनाची सिध्दी आपल्या प्रयत्नावर अवलंबून आहे.

या क्रांतीच्या काळात तुम्ही स्त्रीच्या जन्माला आलात हे सद्‌भाग्य आहे. कारण साधारणपणे स्त्री ही स्थितिवादी असते. क्रांतीचे नेतृत्व कुठला तरी पुरुष करीत असतो. स्त्री जीवनाची मूल्ये बंडखोर स्त्रियांनाच बदलावी लागतील. पुरुषांपेक्षा स्त्रिच्या बाबतीत परिस्थिती अधिकच प्रतिकूल व विषम आहे. पण परिस्थिती जितकी अधिक प्रतिकूल तितकाच पराक्रमाला अधिक वाव असतो ना? स्त्रिला नैसर्गिक प्रतिकूलता जन्मप्राप्त असते. तिचे शरीर नाजूक असते ही दुसरी प्रतिकूलता आणि ती अभिलाषेचा विषय होऊ शकते हेही खरे !

पण तुम्हा बंडखोर मुलींना हे आव्हान आहे. परंपरेच्या विरुध्द तुम्हाला बंड करावयाचे आहे. शरीराने दुबळी, तकलुपी व नाजूक असणाऱ्या स्त्रिला बंडाचे नेतृत्व स्वीकारावयाचे आहे. आज कुटुंबाचा पालनकर्ता, रक्षीयता व कर्ता पुरुष आहे. तो सगळ्यात बलवान असतो असे थोडेच आहे. तरी त्याचे नेतृत्व आपण मान्य करतो ना? शरीरबल हे जीवनाच्या पात्रतेचे अंतिम गमक नव्हे हे तत्व प्रस्थापित करणे रुपवान, बुध्दिमान व तरुण ध्येयवादी, पराक्रमी तरुणींचेच काम आहे.

आजपर्यंत स्त्री–पुरुष आपापल्या खुराड्यात राहात होती. आपापल्या स्त्रीत्वाची व पुरुषत्वाची जाणीव विसरुन एकमेकांच्या सान्निध्यात राहण्याचे वळण त्यांना नव्हते. स्त्री पुरुषासोबत एकत्र आत्मरक्षणाच्या वृत्तीने वागते किंवा त्याच्या अनुरंजनाच्या वृत्तीने वागते. बरोबरीच्या नात्याने वागण्याची तिला सवयच नाही म्हणून पुरुषालाही नाही. जी स्त्री मोकळी वागते तिची दृष्टी शुध्द असावी. दृष्टी शुध्द असली म्हणजे पाऊल सरळ पडते. पाऊल शुध्द दृष्टीने टाकले, दृष्टी शुध्द असली म्हणजे जीवनाचे दर्शनही स्वच्छ

असते. दृष्टी हे प्रकाशाचे तत्व आहे. नित्य प्रकाशात जगावे म्हणजे जीवन उज्वल होते. अंधार टाळावा, गुप्तता टाळावी म्हणजे तमोगुणाची बाधा होत नाही. काळोखी चिकटत नाही. जीवनाची उज्वलता व प्रांजळता डोळ्यात उमटते. डोळे हे अंतःकरणाचे आरसे असतात. निर्मळ चारित्र्याचे तेज व मांगल्य दृष्टीत प्रकट होते आणि साऱ्या जीवनाला प्रकाशित करते. काळाच्या आघातांना धीरोदात्तपणे तोंड दिले म्हणजे तोच काळ मरण न देता शरण देतो. माणसाला नवे व दिव्य असे अमर जीवन देतो.

ज्यांच्या विचारात व व्यवहारात विरोध राहतो त्यांच्या जीवनात असमाधान राहते. संपूर्ण दुर्गुणी, शंभर टक्के पापी, असाध्य दुष्ट या जगात कोणीही नाही असा प्रत्यय मनाला आला पाहिजे. आपण स्वतःच दुर्गुणी नाही तर इतर कोणी कसा असेल ही खूण मनाला पटावी. म्हणून इतरांची सुधारणा करण्याच्या भरीस पडू नये. सेवा इतरांची करावी, ती निरपेक्ष करावी म्हणजे स्वतःची सुधारणा होते. अशाने वृत्ती आंबत नाही, विटत नाही, निराशा होत नाही. निरपेक्ष स्नेहाला अपात्र कोण आहे? स्वतःला सांभाळावे, इतरांचा सांभाळ प्रभु करील, तो समर्थ आहे ही माझी अध्यात्माची कल्पना आहे.

तुमचा
दादा

खामगाव
ता. १३–५–४६

*प्रिय मुलींनो,*

कौटुंबिक भावनेचा विस्तार हे मी आपले जीवित कार्य मानले आहे. त्यात मला लांबी रुंदीपेक्षा खोलीची चाड अधिक आहे. अजस्त्रतेपेक्षा उत्कटतेवर अधिक भर आहे. मी माझ्या स्नेहाने तुमचे पुत्रत्व संपादन केले आहे, तेव्हा ते मानसिक नाही, स्नेहार्पित आहे म्हणून मला ते सोडून देता येते नाही.

मध्ये काही वर्षे लग्नकार्यांना जायचेच नाही असे मी ठरविले होते. लग्नसमारंभात अवास्तव खर्च करुन नसते वैभव प्रदर्शन करण्याची व कर्जबाजारी होण्याची जी दुष्ट सवय आपल्या समाजातील लोकांना पडू लागली होती, तिचा आपल्यापुरता प्रतिकार म्हणून मी हे धोरण स्वीकारले होते, आपल्या आप्तेष्टांच्या व जातीच्या लग्नांना जाण्याचा प्रसंग येत असे ते मला मानवण्याजोगे नव्हते. आता माझ्या कुटुंबात अक्षरशः सर्व धर्माची, प्रांताची व सर्व जातीची मुले–मुली सामील झालेली आहेत. त्यामुळे लग्नांना हजर न राहण्याचा पूर्वीचा आग्रह सोडून दिला आहे. म्हणून तुझ्या लग्नाला येणे मला आवडले असते.

पण लग्न म्हणजे गंमत नव्हे, आईबापांची उत्सवप्रियता तृप्त करण्याचा समारंभही नव्हे. श्रीमंताच्या मुलांच्या कौतुकाचा प्रसंगही नव्हे. श्रीमंताची मुले काही बाबतीत इतरांपेक्षा बथ्थड व अडाणी असतात, पण काही बाबतीत हुशार व सज्ञान असतात. इस्टेटीचे व्यवहार सांभाळणे, सत्ता गाजविणे, इतमाने राहणे या बाबीचे बालपणापासून वळण असते. लग्नाच्या बाबतीतही श्रीमंतांची मुले लवकर शहाणी होतात. पण गरिबाच्या बाबतीत लग्न सुलभ नसते. आर्थिक अडचण पदोपदी नडते, म्हणून श्रीमंतांच्या मुलांना लग्न खेळ वाटण्याचा संभव असतो. जबाबदारी नसल्याने त्याचे गांभीर्य व पावित्र्य लवकर यावे तितके लक्षात येत नाही.

लग्न गरिबाचे असो, की श्रीमंताचे, त्याच्या बाह्य आकारात व थाटामाटात फरक असला तरी स्वरुपात असण्याचे कारण नाही. वैयक्तिक दृष्ट्या तो संयुक्त जीवनाचा आरंभ आहे. जसा पती तसे जीवन हे एकांगी व एकेरी सूत्र आता विवाहित आयुष्याला लागू होता कामा नये. गृहिणी म्हणजे

घर, जशी लक्ष्मी तसे घर हेही सूत्र अर्धवट व अनर्थकारक आहे. एकाचे जीवन दुसऱ्यात मिसळून गेले, लोप पावले, हरपले म्हणजे काही ते समृध्द व वैभवशाली होणार नाही. वेणीच्या पदराप्रमाणे दोन जीवने एकमेकात गुंफली गेली म्हणजे तो संगम तीर्थराजापेक्षाही पुण्यमय व श्रेयस्कर होईल.

लग्न म्हणजे कौटुंबिक जीवनाचा उपक्रम. मुलीचा गृहप्रवेश म्हणजे मुलाचा गृहस्थाश्रमात प्रवेश. वैयक्तिक दृष्टीने दोघांच्याही संयुक्त जीवनाच्या साधनेचा प्रारंभ आणि सामुदायिक दृष्ट्या सहजीवनाच्या प्रयोगाचा हरिःओम् ! दांपत्य जीवन म्हणजे संयुक्त जीवनाचा निरंतर प्रयोग आणि कुटुंब म्हणजे सहजीवनाची प्रयोगशाळा. एक नवीन माणूस तुमच्या कुटुंबात दाखल होतो. बालपणीचे सारे आप्त व मायेचे संबंध तोडून ती मुलगी मुलावर निष्ठा ठेऊन नवीन नाती जोडण्यास तयार होते. या प्रयोगाचे अधिष्ठान मुलगा असतो. हा प्रयोग मोठा गंभीर व नाजूक असतो. परंपरागत संस्कारामुळे मुलीच्या मनाची भूमिका तयार असते, पण कुटुंबातील माणसांना तिच्या ठिकाणी जिव्हाळा व आत्मियता उत्पन्न करता आला पाहिजे. या स्वकियत्वाच्या भावनेचा अभ्यास व विकास करण्याची शाळा म्हणजे कुटुंब !

तुमचे संयुक्त जीवन व कौटुंबिक जीवन प्रसादमय व कल्याणमय होवो अशी प्रार्थना माझ्या हृदयातून उत्कटतेने उठत आहे.

तुमचा
दादा

नागपूर
ता. १४–८–१९७२

*प्रिय मुली,*

त्या दिवशी तू पवनारला फार आग्रह केलास. बाल हट्टातून सुटका करुन घेणे कठीणच. त्यातूनही तुझा तर बालिका हट्ट ! त्याच्या आक्रमणाने मी पराभूत झालो, व तुला हे पत्र लिहित आहे. मी आपली भूमिका तुला समजाऊ शकलो नाही. आजपर्यंत मी जीवनात आत्ममर्यादा व लोक मर्यादा यांचे यथासंभव पालन करीत आलो. कधीकधी मी खूप पानसुपारी खात होतो, परंतु वडिलांच्या समोर अथवा सोबत असता मी कधीही पानसुपारी खात नसे. त्याचप्रकारे संस्थांच्या बाबतीतही मर्यादा पाळतो. कण्वमुनींच्या आश्रमातील ब्रह्मचारीवृंदाने दृष्यंताला आश्रम क्षेत्रात हरिणाची शिकार करण्यास प्रत्यवाय केला. कारण ती आश्रमाची मर्यादा होती. मी आपल्या मर्यादा व संस्थांच्या मर्यादा फार ओळखून असतो व सहसा त्यात अतिक्रमण करीत नाही. मैत्री मासिकाची एक मर्यादा आहे व तिला प्रतिष्ठा पण आहे. तिने वृत्तसृष्टीत काही आदर्श व निकष निर्माण केले आहेत. त्या पत्रिकेची एक दृष्टी आहे, एक विशिष्ट भूमिका आहे म्हणून त्या मर्यादेचे पालन करणे मी आपला धर्म मानतो. परंतु तुम्हा मुलींच्या निर्व्याज प्रेमाने मी भारावून जातो. मला पण तुम्हा मुलींविषयी शब्दात व्यक्त न करता येणारे जिव्हाळा व वात्सल्यायुक्त प्रेम वाटते म्हणून मी लिहावयास बसलो.

गेल्या पन्नास वर्षापासून स्त्री–पुरुषांच्या संबंधातील स्त्रीची गौण भूमिका बघून मी व्यथित होत आलो. जसजशी स्त्री स्वतंत्र होऊ लागली तसतशा माझ्या आशा वाढू लागल्या. परंतु आशेसोबत चिंताही वाढू लागली आणि मी बेचैन होऊ लागलो. स्त्री–पुरुषांचे मुक्त प्रेम व मुक्त संबंधांची वर्णने वाचनात येऊ लागली व दृश्येंही बघू लागलो. परंतु एक प्रश्न जो माझ्या मनात निरंतर घोळू लागला व तो आजतागायतही निरुत्तरीत आहे, तो म्हणजे स्त्रियांच्या ब्रह्मचार्याचे काय? पुरुषाचे ब्रह्मचर्य जितके स्वायत्त आहे तितके स्वाधीनही आहे. अर्थात त्याच्या इच्छेशिवाय व संमतीविना त्याचे ब्रह्मचर्य भंग होऊ शकत नाही. परंतु स्त्रिच्या बाबतीत अशी परिस्थिती नाही. स्त्रीचे ब्रह्मचर्य स्वायत्त असू शकते, परंतु तिच्या इच्छेविना व संमतीशिवाय तिचा कौमार्य भंग होऊ शकतो. तिच्याबाबत हा दोष प्राकृतिक आहे. ईश्वराने

जणू काय तिला दुर्बलतेच्या जोडीने जन्माला घातले आहे. याचबरोबर मी हेही मानतो आणि पाहतो की, मनुष्य निसर्गगामी नाही. तो निसर्गाचा दास बनून राहत नाही उलट सतत तो निसर्गाच्या उणिवा पूर्ण करण्यासाठी व त्यातील दोषांचे निराकरण करण्यासाठी सतत झटत असतो. उलट यातच त्याचे स्वत्व दिसून येते आणि यातच त्याचा पुरुषार्थ दडलेला असतो. याला मी मानवार्थ म्हणतो कारण त्यातील पुरुष शब्दात स्त्रीचा समावेश होत नाही.

पुरुष आणि स्त्री दोहोच्या ठिकाणी काम प्रेरणा असते. भिन्न मात्रेत असू शकते, पण दोहोच्या ठिकाणी ती प्रेरणा सामान्य आहे. पुरुष संयम करुन ब्रह्मचर्याचे अनुष्ठान करु शकतो. यथार्थतेने ब्रह्मचर्य पाळण्यात स्त्रीचा तिरस्कार वा घृणा नसते आणि तिच्याबाबत भयाची भावनाही नसते. परंतु स्त्रीच्या नैसर्गिक मर्यादा लक्षात घेतल्यास तिच्यासाठी कदाचित ब्रह्मचर्य श्रेयस्कर मानले गेले. तिथे स्त्रीसाठी मात्र मातृत्व हेच उत्कृष्ट मानले गेले. परिणामतः मातृत्वाची आकांक्षा हेच स्त्रीच्या स्वभावाचे विशिष्ट लक्षण मानण्यात आले. स्त्रीच्या बाबतीत मातृत्वाच्या आकांक्षेबद्दल प्रशंसा करावयाची व पुरुषासाठी मात्र नैष्ठिक ब्रह्मचर्य हेच त्याच्या चारित्र्याचे गौरीशंकर मानावयाचे असा भेदभाव का, ही विसंगती का, हे मला अजूनही समजू शकले नाही. याच धारणेच्या परिणामस्वरुप दोघांच्या काम प्रेरणेविषयी समाजात भिन्नभिन्न मानदंड प्रचलित झाले. कामसंबंध हे नीच व पापमय मानले गेले. परंतु त्या संबंधाशिवाय मातृत्व असंभव आहे व मातृत्वाची थोरवी तर सहस्त्रमुखांनी गायिली गेली व त्याचा महिमाही महान मानला म्हणून स्त्रीजीवनामध्ये मातृत्वाच्या आकांक्षेचा संस्कार खोलवर रुजला. मातृत्वाची आकांक्षा विवाहाच्या आकांक्षेत परिणत होणे क्रमप्राप्तच झाले. पुरुषाच्या ब्रह्मचर्य निष्ठेमुळे स्त्रीचा सदैव सतर्क व सावधान राहण्याचा संस्कार अधिकच दृढ होत गेला व स्त्रीच्या नैसर्गिक दुर्बळतेमुळे प्रत्येक स्त्रीच्या मनात पुरुषांबद्दल भीती व कुशंका बाळगण्याचा संस्कारही रुजत गेला. प्रश्न असा आहे की, अशा समाजात स्त्रीचा ब्रह्मचर्याचा संकल्प स्वायत्त राहू शकतो काय? स्त्रीचे ब्रह्मचर्य तिच्या संमतीविना भंग होणार नाही, अशी परिस्थिती समाजात निर्माण करणे शक्य आहे काय? माझ्या अल्पबुध्दिनुसार स्त्रीच्या जीवनाची हीच अंतिम आणि निर्णायक समस्या आहे.

जर आपण असे मानू लागलो की स्त्रीची नैसर्गिक असमर्थता अनिराकरणीय आहे तिचे निराकरण होऊ शकत नाही, तर स्त्रीची पुरुषनिर्भरता देखील अनिवार्य मानावी लागेल, मग तिचा धर्म ब्रह्मचर्य नव्हे

तर पातिव्रत्यच मानावा लागेल आणि अशा परिस्थितीत दोघांसाठी नैतिकतेचे मानदंड भिन्नभिन्न असणे प्रशस्त मानले जाईल.

आणि हाच प्रश्न माझ्या बुध्दीला सतत कुंठित करीत असतो. या परिस्थितीतून कोणताही मार्ग निघू शकत नाही, हे मानायला माझे मन तयार होत नाही. मला असे दिसून येते की, स्त्रीची भिस्त पुरुषाच्या आक्रमण शीलतेत परिवर्तित होऊ पहात आहे आणि जोपर्यंत स्त्रीच्या मनात असलेली पुरुषाबद्दलची भीती नाहीशी होत नाही, तोपर्यंत तिची मानवता देखील गौणच राहील. म्हणूनच माझे मन या समस्येतून मार्ग काढण्याची खटपट करीत राहते. युरोप, अमेरिका आणि भारत येथील आधुनिक तरुण तरुणींमध्ये मुक्त कामसंबंध मी पाहतो पण तरी देखील माझ्या या प्रश्नाचे उत्तर मला सापडलेले नाही. ज्या तरुणीला आपल्या शरीराचा उपभोग घेऊ द्यावयाचा नसेल त्या तरुणीला कोणता स्वायत्त उपाय योजिता येईल? जोपर्यंत या प्रश्नाचे उत्तर मिळणार नाही तो पर्यंत मुक्त काम संबंधात देखील स्त्री ही पुरुषाच्या संरक्षणातच राहील. तिचे स्वातंत्य पुरुषाच्या कृपाशीलतेवरच अवलंबून राहील.

मला असे वाटते की यातून एकच मार्ग असू शकतो आणि तो हा आहे की, स्त्रीने आपल्या शारीरिक शक्तीच्या जागी अशी दुसरी शक्ती जागृत आणि विकसीत करावी की ज्यासमोर शारीरिक शक्ती कुंठित होईल व असमर्थ ठरेल. मी याला चारित्याची शक्ती म्हणतो. प्रतिकूल परिस्थितीत आपले सत्व सांभाळून घेण्याची स्त्रीची शक्ती याचेच नाव चारित्याची शक्ती आहे. शारीरिक दुर्बलतेची सतत जाणीव बाळगल्यामुळे स्त्री ही शरीरनिष्ठ व रुपनिष्ठ बनली आहे. पुरुषाच्या तुलनेत ती अधिक रुपनिष्ठ व देहात्मवादी होत आहे. या संस्कारातून मुक्त होण्यासाठी तिने आपले शरीर अशोभनीय व अनाकर्षक ठेवण्याची आवश्यकता नाही, ती तर उफराटी पुरुषनिष्ठाच ठरेल. आपण पुरुषाचे आकर्षण ठरु नये म्हणून बचाव करण्याच्या दृष्टीने जर तिने हा मार्ग स्वीकारला असेल तर त्यामुळे तिची सत्वहानीच होईल. सौंदर्य ही ईश्वरी देणगी आहे. सौंदर्य व श्रृंगार एक नव्हे. मला कृष्णमूर्तीचे शब्द आठवतात. ब्युटी इज आस्टिअर. सौंदर्यात प्रसाधन नव्हे तर सहज शोभनियता असते. परंतु माझा तर श्रृंगाराला देखील विरोध नाही. माझी मागणी एवढीच आहे की स्त्रीचे ब्रह्मचर्य व मातृत्व दोन्ही स्वायत्त असावे. तिच्या स्वाधीन असावे आणि यासाठी ज्या चारित्याची आवश्यकता असेल तीच आजच्या सर्वसाधारण नैतिकतेपेक्षा अधिक उन्नत राहिल, उदात्त असेल. या

चारित्र्याचे अधिष्ठान कोणते राहिल हा संशोधनाचा विषय आहे.

मी तर आता या निष्कर्षाप्रत पोहोचलो आहे की, नियतीने आणि ईश्वराने स्त्रीच्या व्यक्तित्वाला कुलुपाने बंद करुन त्याची किल्ली चुपचाप तिच्याच पदराला बांधून ठेवली आहे, पण स्त्री मात्र भिरभिरत्या नजरेने जगभर त्याचा शोध घेत आहे. सर्वत्र धुंडाळते पण आपला अंतरात्मा सोडून, विसरुन !

तू स्त्री जीवनातील ब्रह्मविद्येचा अविष्कार शोधण्याचा क्रांतीकारी, युगप्रवर्तक पराक्रमात गुंतलेली आहेस, व्यस्त आहेस म्हणून तुला हात जोडून विनंती करतो की तू जर या समस्येचे समाधानकारक उत्तर शोधून काढू शकलीस तर बांगला देशच्या अगणित स्त्रियांवर जे अत्याचाराचे संकट कोसळले त्याची पुनरावृत्ती इतिहासात होणार नाही, अन्यथा मातृत्वही अभिशापच ठरेल ! मग या मानवतेचे काय होईल, ते परमेश्वरच जाणे !

तुझा स्नेहाधीन
दादा धर्माधिकारी.

REFBK-0026661



प्रिन्ट-ओ-ग्राफिक